मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : 111 ■ सोमवार, 29 डिसेंबर २०२५ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# वाळद येथे मा. सभापती भगवान शेठ पोखरकर यांच्या माध्यमातून विविध विकास कामांचे भूमिपूजन..

**दैनिक युवक आधार**
**डॉ. देवेंद्र ओव्हाळ खेड पुणे.**

वाळद येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन स्मशानभूमी सुशोभीकरण 10. 50 लक्ष. ग्रामपंचायत सुशोभीकरण 10.50 लक्ष. जिल्हा परिषद शाळा सभागृह बांधणे 12.50. लाख जोरीवस्ती रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. 10.50.



त्याप्रसंगी उपस्थित व शुभ हस्ते पुणे जिल्हा शिवसेना प्रमुख मा. सभापती श्री भगवानशेठ पोखरकर, शिवसेना जिल्हा संघटक महादेव लिंबोरे, वाळद गावचे सरपंच मनोहर पोखरकर उपसरपंच विक्रम पोखरकर, तळपे मॅडम ग्रामपंचायत सदस्य नितीन वाळुंज, सौ मीराबाई पोखरकर, सौ धनिका पोखरकर, सौ मनीषा सावंत तळपे मॅडम एस एस फाउंडेशनचे डॉक्टर संतोष सुपे बाजार समिती संचालक सुधीर भोमाळे, समीर सुपे, सौ हिले ताई, सौ मोरमारे ताई, प्रकाश पोखरकर, बाळासाहेब सावंत, चंद्रकांत शिंदे, चंद्रकांत पोखरकर, दीपक पोखरकर, इत्यादी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अपंग, आजारी कर्मचाऱ्यांना निवडणूक ड्युटी रद्द करण्याची संधी...

**मुंबई** : निवडणूक प्रक्रियेदरम्यान संवेदनशील घटकातील कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या निवडणूक कर्तव्याबाबत मानवी दृष्टीकोनातून निर्णय घेण्यात आला आहे. आजारी, अपंग, गर्भवती अशा संवेदनशील कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली निवडणूक ड्युटी रद्द करून घेण्यासाठी मुंबई महापालिकेने विशेष सुविधा उपलब्ध करून दिली आहे. याबाबतचा अर्ज कर्मचाऱ्यांना करता येणार आहे.

मुंबई महापालिकेची निवडणूक अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. या निवडणूकीसाठी मुंबई महापालिकेला सुमारे ७५ हजारापर्यंत कर्मचाऱ्यांची आवश्यकता लागणार आहे. करीता विविध विभागातून कर्मचाऱ्यांची मागणी करण्यात आली आहे. या सर्व कर्मचाऱ्यांचे येत्या सोमवारपासून प्रशिक्षण सुरू होणार आहे. निवडणूक कर्तव्याला नकार देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याचा इशाराही मुंबई महापालिका प्रशासनाने दिला आहे. असे असले तरी निवडणूकीच्या कामांचे वाटप करताना प्रशासनाने माणूसकी दाखवावी अशी मागणी महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेने केली होती. मुंबई महापालिका प्रशासनाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनाही निवडणूकीचे काम दिले आहे. निवडणूकीची कामे देताना प्रशासनाकडून संवेदनशीलता व नियोजनाचा अभाव दिसून येत असून शिक्षक कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण होत असल्याचे मत महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेने व्यक्त केले होते. अपंग शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, गर्भवती महिला, स्तनपान करणाऱ्या महिला तसेच गंभीर आजार असणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवडणूक ड्युटी रद्द करावी अशी मागणी संघटनेचे अध्यक्ष तानाजी कांबळे यांनी केली होती. संवेदनशील घटकांमधील सर्वच कर्मचाऱ्यांना निवडणूकीचे काम रद्द करण्यासाठी अर्ज करण्याची संधी मुंबई महापालिका प्रशासनाने दिली आहे. मशीद बंदर येथील मुंबई महापालिकेच्या निवडणूक कार्यालयात या संबंधीचे अर्ज स्वीकारले जाणार आहेत. दरम्यान, याबाबत मुंबई महापालिकेच्या निवडणूक विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले की, सर्वच विभागातील ज्या कर्मचाऱ्यांना निवडणूकीचे काम देण्यात आले आहेत त्यांच्या प्रकृती संदर्भात काही गंभीर बाबी असतील तर त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करून अर्ज करता येणार आहे. ही सुविधा प्रत्येक निवडणूकीच्यावेळी दिली जाते, तशी ती यंदाही दिली आहे. कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या अर्जाचा आणि प्रमाणपत्राचा विचार करून पुढील निर्णय घेतला जाणार आहे. दरम्यान, मुंबई महापालिकेला निवडणूकीसाठी ७५ हजार कर्मचाऱ्यांची आवश्यकता असली तरी त्यापैकी सुमारे दहा हजार कर्मचाऱ्यांनाच सध्या निवडणूकीचे काम दिले आहे. तर उर्वरित कर्मचारी हे निवडणूकीच्या आदल्या दिवशी व निवडणूकीच्या दिवशी कार्यरत असतील, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# खंडेश्वर यात्रेनिमित्त सुलेमान देवळा येथे कै.राम पाटील घोडके व कै. अनिल पाटील घोडके यांच्या स्मरणार्थ अन्नदान

**दैनिक युवक आधार**
**बाळासाहेब रकटाटे आष्टी,**

– दरवर्षी मोठ्या श्रद्धेने साजरी होणारी खंडेश्वर यात्रा यंदाही सुलेमान देवळा येथे भक्तिभावाच्या वातावरणात पार पडली. यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविक भक्तांचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. या पावन प्रसंगी कै. ह.भ.प. राम पाटील घोडके व कै. ह.भ.प. अनिल पाटील घोडके यांच्या स्मरणार्थ आयोजित अन्नदान कार्यक्रम उत्स्फूर्त प्रतिसादात व शिस्तबद्धरीत्या संपन्न झाला.



शनिवार, दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता झालेल्या या अन्नदान कार्यक्रमास परिसरातील तसेच दूरवरून आलेल्या भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यात्रेच्या निमित्ताने धार्मिक श्रद्धा, सामाजिक बांधिलकी आणि आपुलकी यांचा सुरेख संगम अनुभवास आला. भाविकांनी रांगेत उभे राहून शांततेत अन्नप्रसादाचा लाभ घेतला.

खंडेश्वर यात्रेच्या निमित्ताने दिवंगतांच्या स्मरणार्थ समाजोपयोगी उपक्रम राबविणे ही सुलेमान देवळा गावाची सामाजिक व धार्मिक परंपरा असून, अन्नदानाच्या माध्यमातून कै. ह.भ.प. राम पाटील घोडके व कै. ह.भ.प. अनिल पाटील घोडके यांच्या कार्याला आदरांजली अर्पण करण्यात आली. त्यांनी आपल्या आयुष्यात वारकरी संप्रदाय व समाजसेवेसाठी दिलेले योगदान उपस्थितांनी श्रद्धेने स्मरले.

या अन्नदान कार्यक्रमाचे सौजन्य श्री गणेश डोअर्स अँड फेटवाले व किशन रामभाऊ घोडके यांचे होते. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी गावकरी, नातेवाईक, स्वयंसेवक व युवकांनी परिश्रम घेतले. स्वच्छता, शिस्त व नियोजनामुळे कार्यक्रम सुरळीत पार पडल्याचे भाविकांनी नमूद केले.

खंडेश्वर यात्रेच्या निमित्ताने अशा सामाजिक उपक्रमांतून धार्मिक परंपरा जपण्यासोबतच माणुसकीचा संदेश समाजात पोहोचत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# 'शोध:खऱ्या आईचा' या कादंबरीचे प्रकाशन

दैनिक युवक आधार
(शिरूर कासार)



निसर्गाकिडून मिळणाऱ्या नात्यापेक्षा मानलेलं अथवा जोडलेलं नातं हे निखळ,निस्सीम आणि श्रेष्ठ असू शकतं व ते निसर्गावर सुद्धा मात करू शकतं हे नवोदित लेखिका कु.वर्षा भाबड यांनी 'शोध: खऱ्या आईचा' या कादंबरीतून साधार स्पष्ट केले आहे. शिरूर (कासार) जि.बीड, येथे भरलेल्या '७ वे सिंदफणा मराठी साहित्य संमेलन' प्रसंगी मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील,साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा.अमर हबीब, साहित्यिक डॉ.दादा गोरे,पद्मश्री शब्बीर(मामू)सय्यद,सामाजिक कार्यकर्त्या प्रा.सुशीलाताई मोराळे,कथाकार डॉ.भास्कर बडे कार्यवाहक मा.दगडू लोमटे, ह.भ.प. विवेक शास्त्री महाराज,मा.नवनाथ सानप,बालसाहित्यिक डॉ.विठ्ठल जाधव इत्यादी मान्यवरांच्या हस्ते या कादंबरीचे प्रकाशन मोठ्या थाटात संपन्न झाले.यावेळी मराठी साहित्यिक, साहित्य रसिक व प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# पैनगंगा नदीवर भरदिवसा रेतीची लूट; बावनकुळेंचा तस्करी रोखण्याचा आदेश, पण अधिकारी मात्र सुस्त!

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेन्दोर**

विदर्भ आणि मराठवाड्याच्या सीमेवरून वाहणाऱ्या पैनगंगा नदीतून सध्या मोठ्या प्रमाणात रेतीची तस्करी सुरू आहे. विशेषतः घाटंजी तालुक्यात वाळू माफियांनी धुमाकूळ घातला असून, भरदिवसा नदीचे पात्र पोखरले जात आहे.


राज्याचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी संपूर्ण महाराष्ट्रात रेती तस्करांविरोधात कठोर पावले उचलण्याचे आदेश दिलेले असतानाही, स्थानिक अधिकारी मात्र याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसत आहे.

नेमकी परिस्थिती काय आहे?

घाटंजी तालुक्यातील पैनगंगा नदीच्या पात्रात सध्या भन्नाट तस्करी सुरू आहे. तस्करांना आता कायद्याचे किंवा पोलिसांचे भय उरलेले नाही. पहाटेपासून ते रात्रीपर्यंत शेकडो वाहने अवैध रेती घेऊन जाताना दिसतात. यामुळे नदीतील पाण्याचा स्तर खालावत असून पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे. ग्रामस्थांनी वारंवार तक्रारी करूनही संबंधित विभागाचे कर्मचारी आणि अधिकारी कोणतीही कारवाई करताना दिसत नाहीत, ज्यामुळे प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

**चंद्रशेखर बावनकुळे यांची भूमिका काय?**

महसूल क्षेत्रातील कामाचा अनुभव असलेले चंद्रशेखर बावनकुळे यांनी रेती तस्करीबद्दल नेहमीच आक्रमक



पवित्रा घेतला आहे. त्यांनी स्पष्ट केले आहे की:

तस्करांवर गुन्हे: रेती चोरी करणाऱ्यांवर केवळ दंड न लावता थेट पोलीस तक्रार (FIR) दाखल झाली पाहिजे.

अधिकाऱ्यांची जबाबदारी: ज्या भागात तस्करी होईल, तिथल्या जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.

सामान्यांना दिलासा: गोरगरिबांना घरकुल बांधण्यासाठी रेती स्वस्त मिळाली पाहिजे, यासाठी तस्करांची साखळी तोडणे गरजेचे आहे.

**जनतेचा संतप्त सवाल**

एकिकडे शासन 'रेती तस्करी मुक्त महाराष्ट्र' करण्याच्या बाता मारत आहे, तर दुसरीकडे घाटंजीमध्ये अधिकाऱ्यांच्या डोळ्यादेखत नदी लुटली जात आहे. "महसूल मंत्री आणि वरिष्ठ नेते कडक कारवाईचे आदेश देत असताना, स्थानिक अधिकारी कुणाच्या दबावाखाली गप्प आहेत?" असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत.

पैनगंगेचे अस्तित्व वाचवण्यासाठी आता तातडीने या तस्करीला लगाम लावण्याची गरज निर्माण झाली आहे.

# पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2025

## स्वीप अंतर्गत लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये मतदार जनजागृती स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेच्या स्वीप

उपक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे येथे नुकतेच विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभाग नोंदवून मतदानाबद्दल सकारात्मक संदेश दिला.



पनवेल महानगरपालिकेच्या वतीने मतदान जनजागृतीसाठी निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठे येथे चित्रकला, निबंध लेखन, पत्र लेखन, वक्तृत्व, रांगोळी आणि पोस्टर मेकिंग या प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी सर्जनशील कल्पनांच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व, जबाबदारी आणि लोकशाही मूल्ये प्रभावीपणे मांडली.

यावेळी मार्गदर्शन करताना शाळेचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी म्हणाले "मतदान हा फक्त हक्क नाही, तर भविष्य घडवण्याची संधी आहे. लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये लोकशाहीची जाणीव निर्माण झाली, तर उद्या ते सजग व जबाबदार मतदार बनतील. या स्पर्धांनी त्यांची सामाजिक जाणीव नक्कीच वाढवली,"

या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये मतदार जागरूकता, सामाजिक जबाबदारी आणि लोकशाहीबद्दल आदर निर्माण झाल्याचे समन्वयक शिक्षिका रूहल सिंह यांनी सांगितले. यावेळी घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

# आसडी जिल्हा परिषद शाळेत 'आनंदनगरी' उत्साहात संपन्न; चिमुकल्यांच्या बाजारपेठेने वेधले लक्ष

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** तालुक्यातील आसडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत २७ डिसेंबर रोजी 'बाल आनंदनगरी'चे अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक ज्ञानात भर पडावी आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळावा, या उद्देशाने भरवण्यात आलेल्या या उपक्रमाने ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले.

कार्यक्रमाचे उद्घाटन शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सांडू सुरडकर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी गावाचे सरपंच सुधाकर मिरगे यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांमधील व्यवहारचातुर्य वाढवण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

चिमुकल्यांनी मांडली खाद्यपदार्थांची दुकाने:
या आनंदनगरीत विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले विविध चविष्ट खाद्यपदार्थ विक्रीसाठी ठेवले होते. ग्रामस्थ आणि पालकांनी या स्टॉल्सना भेट देऊन मोठ्या आवडीने पदार्थांचा आस्वाद घेतला. या माध्यमातून विद्यार्थ्यांना हिशोब ठेवणे, संवाद साधणे आणि बाजारपेठेचे प्राथमिक धडे मिळाले.

या सोहळयाला गजानन विद्यालयाचे मुख्याध्यापक तुपे सर, जि.प. शाळेचे मुख्याध्यापक साळवे सर, तसेच संजय सोनवणे, गणपत मिरगे व गहिनीनाथ कडूबा शिरसाट यांची विशेष उपस्थिती होती. शाळेतील सर्व शिक्षक वृंद, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षणप्रेमी आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक साळवे सर आणि सर्व शिक्षक कर्मचारी वृंदाने विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे संपूर्ण परिसरात कौतुक होत आहे.



# एनआयए' मधील साहसी कामगिरीबद्दल पोलीस उपायुक्त श्री. बजरंग बनसोडे यांना 'केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक' प्रदान

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी**
**मारुती सत्रे**

देशाच्या अंतर्गत सुरक्षेला आव्हान देणाऱ्या दहशतवादी कारवायांचा बीमोड करण्यात आणि अत्यंत संवेदनशील गुन्ह्यांच्या तपासात मोलाची भूमिका बजावल्याबद्दल बीड जिल्ह्याचे सुपुत्र आणि मुंबईचे पोलीस उपायुक्त श्री. बजरंग आनंदराव बनसोडे यांना मानाचे 'केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक' प्रदान करण्यात आले.

काल २७ डिसेंबर २०२५ रोजी नवी दिल्ली येथे आयोजित 'आतंकवाद विरोधी संमेलनात' देशाचे गृहमंत्री मा. नामदार अमित शाह व वरिष्ठ स्तरावरील अधिकारी यांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा दिमाखात पार पडला.

राष्ट्रीय तपास यंत्रणा (NIA) ही देशातील सर्वोच्च तपास संस्था आहे, आंतरिक सुरक्षा, दहशतवाद व देशविघातक कारवाया आणि अंमली पदार्थांच्या तस्करींसारख्या गुन्ह्यांचा तपास करते.

श्री. बजरंग बनसोडे यांनी मे 2022 ते ऑगस्ट 2025 पावेतो 'एनआयए' मध्ये अपर पोलीस अधीक्षक म्हणून प्रतिनियुक्तीवर काम केले. या काळात त्यांनी देशाच्या सुरक्षेसाठी अनेक 'स्पेशल ऑपरेशन्स' यशस्वी केली, तसेच उत्कृष्ट तपास केले, त्यांच्या याच निष्ठेची आणि शौर्याची दखल घेत केंद्र सरकारने त्यांना या पदकाने सन्मानित केले आहे.




**एक प्रेरणादायी जीवनप्रवास :**
बीडच्या ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील श्री. बजरंग बनसोडे यांचा प्राथमिक शिक्षक ते पोलीस उपायुक्त प्रवास हा अत्यंत खडतर पण तितकाच जिद्दीचा व प्रेरणादायक आहे.

- बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील रुई नालकोल सारख्या छोट्या गावात, एका गरीब शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला.
- प्रतिकूल परिस्थितीमुळे त्यांना शिक्षणासाठी मोठा संघर्ष करावा लागला. ११ वी आणि १२ वीच्या शिक्षणासाठी ऊन-पावसाची तमा न बाळगता ते रोज २० किलोमीटर सायकल चालवून शाळेत जात असत.
- पुढील शिक्षणासाठी पैसा उभा राहावा म्हणून त्यांनी पनवेल येथील एका रसवंतीवर अवघ्या ५०० रुपये महिना पगारावर काम केले आणि आज त्याच मुंबईत ते पोलीस उपायुक्त पदावर कार्यरत आहेत.

शिक्षक ते पोलीस अधिकारी :
सुरुवातीला त्यांनी धाराशिव आणि बीडमध्ये प्राथमिक शिक्षक म्हणून काम केले. मात्र, प्रशासकीय सेवेची जिद्द त्यांना स्वस्थ बसू देईना.

स्पर्धा परीक्षेतून त्यांची दोनदा फौजदार, एकदा मुख्याधिकारी आणि शेवटी पोलीस उपअधीक्षक पदी निवड झाली.

**पोलीस अधिकारी म्हणून कारकीर्द :**
श्री. बजरंग बनसोडे यांनी आपल्या कारकिर्दीत मिरज, अहिल्यानगर, उपविभागीय अधिकारी, महाराष्ट्र पोलीस प्रबोधिनी नाशिक, सहायक पोलीस आयुक्त, ट्रॉम्बे, पोलीस अधीक्षक (स्पेशल ऑपरेशन्स), महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि बुलढाणा येथे अपर पोलीस अधीक्षक म्हणून उल्लेखनीय सेवा बजावली आहे.

सध्या ते पोलीस उपायुक्त म्हणून बृहन्मुंबई येथे कार्यरत आहेत.

**कुटुंब, गाव आणि जिल्ह्याचा गौरव :**
एका सामान्य पार्श्वभूमीतून आलेल्या युवकाने आपल्या कर्तृत्वाने थेट देशाच्या गृहमंत्रालयाकडून " केंद्रिय गृहमंत्री दक्षता पदक मिळवणे ही बाब केवळ बनसोडे कुटुंबासाठीच नव्हे, तर गाव रुई नालकोल, संपुर्ण बीड जिल्हा आणि महाराष्ट्र पोलीस दलासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

शिस्त, कष्ट आणि राष्ट्रनिष्ठा असेल तर कोणतीही परिस्थिती यशाच्या आड येत नाही, असा संदेशच त्यांनी आपल्या कार्यातून दिला आहे.

या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, भविष्यातही त्यांच्या हातून अशीच देशसेवा घडावी, अशा शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# द ग तटकरे महाविद्यालयाचे एन एस एस शिबीर यंदाही वाशी हवेली गावात

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने हिवाळी निवासी श्रमदान शिबीर यंदाही दत्तक ग्राम वाशी हवेली येथे सोमवार दि.५ जानेवारी ते रविवार दि.११ जानेवारी २०२६ या कालावधीत संपन्न होणार आहे.

या वर्षीच्या शिबीराची मध्यवर्ती संकल्पना 'शाश्वत विकासासाठी युवक' अशी असुन या संकल्पनेला अनुसरून भरगच्च कार्यक्रमांचे नियोजन असल्याचे कार्यक्रम अधिकारी डॉ.दत्ता कुंटेवाड यांनी माध्यमांना सांगितले.

या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे



म्हणून राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त माजी राष्ट्रीय सेवा योजना राज्य समन्वयक (OSD) प्राचार्य डॉ.अतुल साळुंखे उपस्थित राहणार आहेत. तर विश्वस्त श्री. मारुती शिर्के, श्री विठ्ठल जोशी, श्री.नंदकुमार वेदक उद्घाटक श्री.चंद्रकांत रोडे, उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष श्री.मंगेश देशमुख, उपाध्यक्ष मा.पुरुषोत्तम मुळे, स्वागताध्यक्ष महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन डॉ. श्रीनिवास वेदक आणि तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व मान्यवर पदाधिकारी उपस्थित रहाणार आहेत.

वाशी हवेली हे गाव निसर्गाच्या सान्निध्यात वसलेले असून जवळच असलेल्या खाडीने या गावाची शान आणखीन वाढली आहे. गावात असलेली बहुसंख्य लोकसंख्या, स्वच्छतेच्या सुविधा, नितांत प्रेमळ गावकरी,इथे थुंका वॉश बेसिन, सर्वत्र असणारे सीसीटीव्ही कॅमेरा,वॉटरबेल अशा एक ना अनेक नाविन्यपूर्ण उपक्रमामध्ये गावचा असणारा सहभाग या वर्षी पुन्हा एकदा राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना आकर्षित करत आहे. या वर्षातील शिबीरामध्ये नेत्र चिकित्सा, आरोग्य तपासणी, व्यसनांचा विळखा वेळीच ओळखा, एड्स जनजागृती, जल हेच जीवन, सायबर सुरक्षा, पोलिस आपल्या भेटिला हे अभिनव उपक्रम गावकऱ्यांसाठी असल्याचे डॉ. कुंटेवाड यांनी सांगितले. या शिबीराच्या यशस्वीतेसाठी मुंबई विद्यापीठ कार्यक्रम अधिकारी प्रा.सुशील शिंदे जिल्हा समन्वयक प्रा. तुळशीदास मोकल विभागीय समन्वयक डॉ. प्रविण गायकवाड प्रा. हिंगमिरे प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव, डॉ. भगवान लोखंडे, माजी कार्यक्रम अधिकारी डॉ. राजाराम थोरात, महिला प्रतिनिधी डॉ. तृप्ती थोरात, प्रा. मनोज वाढवळ कार्यक्रम अधिकारी प्रा.भरत चाळके प्रा. सोनम पवार, प्रा.महाडिक, प्रा. साक्षी गायकवाड, प्रा. विजय चव्हाण कार्यालयीन कर्मचारी श्री.विनोद महाजन, श्री.प्रकाश गायकवाड, श्री.मितेश मुळे, श्री.मंगेश पोळेकर, श्री.किशोर मोरे, विद्यार्थी प्रतिनिधी वैष्णवी फुलारी, सम्यक जाधव वाशी हवेली अध्यक्ष श्री ज्ञानदेव तांडेल यांचे सहकार्य लाभणार आहे.

# इंदापूर तालुक्याचा हरीश डोंबाळे अभिमान - कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

**दैनिक युवक आधार**
**इंदापूर प्रतिनिधी**

इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानचे विश्वासराव रणसिंग महाविद्यालयात प्रथम वर्ष कला शाखेत शिक्षण घेत असलेला न्हावी ता. इंदापूर येथील हरीश दिपक डोंबाळे यांनी ओडिसा संबलपूर येथे संपन्न झालेल्या ३० व्या राष्ट्रीय रोड



रेस १०० किमी सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया स्पर्धेत ज्युनिअर वयोगटातुन देशात प्रथम क्रमांक व उत्तराखंड रुद्रपुर येथे ट्रॅक स्पर्धेत टीम स्प्रिंटमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केल्याबद्दल कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते हरीश डोंबाळे याचा भरणेवाडी ता. इंदापूर येथे सन्मान करण्यात आला.यावेळी इंदापूर तालुका ग्रामविकास प्रतिष्ठानचे सचिव विरसिंह रणसिंग, हरीश चे वडील दिपक ,आई आशा ,आजोबा इ मान्यवर व न्हावी गावचे ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी भरणे यांनी सायकलिंग स्पर्धेत देशात हरीश ने महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले असून हरीश इंदापूर तालुक्याचा अभिमान असल्याचे सांगितले.हरीश च्या यशाबद्दल त्याचे कौतुक करीत आई वडील आजोबा व संस्था सचिव विरसिंह रणसिंग यांचे अभिनंदन केले. हरीश ने जिद्दीने १०० किलोमीटर मास्टर्स सायकलिंग स्पर्धेत भारतात प्रथम क्रमांक सुवर्ण पदक मिळवून विश्वासराव रणसिंग महाविद्यालयाचा नावलौकिक केला असल्याचे सचिव विरसिंह रणसिंग यांनी सांगितले.

# संतकवी श्रीमत्सद्गुरु श्रीदासगणु महाराज जयंती उत्सवा निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**उमरी वार्ताहर / रुपेशकुमार ग.श्रीरामवार**

महाराष्ट्र राज्यातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असलेले नांदेड जिल्हातील उमरी तालुक्यातील श्रीक्षेत्र गोरठा येथील श्रीमत्सद्गुरु संतकवी श्रीदासगणु महाराज जयंती उत्सव पौष शु.दशमी ते द्वादशी शके १९४७ दिनांक 30 / 31 डिसेंबर 2025 व 1 जानेवारी 2026 असे तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

धार्मिक कार्यक्रमाचे रूपरेषा प्रथम दिवसीय मंगळवार दि.30 डिसेंबर 2025 सकाळी 7 वाजता ध्यानमंदिर प्रार्थना सकाळी 7:30 ते 9 नित्य प्रार्थना व प्रवचन प्रवचनकार वे.शा.सं. श्री प्रवीण दिवाकर महाराज सकाळी 11:30 वा. आरती मंत्रपुष्प स्तोत्रादि दुपारी 1:30 वा.पाठांतर स्पर्धा दुपारी 4:30 ते 6:30 किर्तन श्री विलास महाराज रेणापुरकर रात्री 9 वा. श्री



विष्णुसहस्त्रनाम स्तोत्र दररोज सकाळी नित्य प्रार्थनेनंतर वेदमूर्ती भागवताचार्य श्री प्रवीण दिवाकर महाराज यांचे प्रवचन, 11:30 वाजता आरती मंत्र पुष्पांजली, 4:30 वाजता किर्तन, रात्री विष्णूसहस्त्रनाम आदी .

व्दितीय दिवस बुधवार दिनांक 31 डिसेंबर 2025 सकाळी 6 वाजता प्रभातफेरी स.6:30वाजता ध्यानमंदिर प्रार्थना व ध्वजारोहण, स.7:30 ते 9 नित्य प्रार्थना व प्रवचन प्रवचनकार वे.शा.सं. श्री प्रवीण दिवाकर महाराज स.9:30 कावडी समर्पण, सद्गुरु साई वस्त्र समर्पण स.11:30 वाजता आरती मंत्रपुष्प स्तोत्रादि, वार्षिकसभा व बक्षीस वितरण दुपारी 4:30 ते 6:30 किर्तन श्री महेश अण्णा आठवले रात्री 9 वाजता श्री विष्णुसहस्त्रनाम स्तोत्रादि रात्री 9:30 वा.श्रीदासगणु महाराज पालखी मिरवणुक.

तृतीय दिवसीय गुरुवार दि.1जानेवारी 2026 स.7 वाजता ध्यानमंदिर प्रार्थना, स.7:30 ते 9 नित्य प्रार्थना व प्रवचन प्रवचनकार - वे.शा.सं. श्री प्रवीण दिवाकर महाराज स.9:30 श्री विक्रम नांदेडकर यांचे काल्याचे किर्तन व आरती आदी कार्यक्रम होणार आहेत. तरी उमरी तालुका परिसरातील विविध शहरातील भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीदासगणू महाराज प्रतिष्ठान च्या वतीने करण्यात आले आहे.

# साईकृपा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पहिल्या सभेला रहिवाशांचा भरघोस प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी: प्रविणभाऊ पवार**

**मुंबई** : खार दांडा येथील साईकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था (SRA ) मार्फत रविवार दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी मधला पाडा, गोविंद पाटील मार्ग, खार दांडा येथे निमंत्रित सभासदांची पहिली निमंत्रित सभासद सभा उत्साहात पार पडली.

सदर सभा संस्थेचे मुख्यप्रवर्तक श्री. नरेश मोरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या सभेत संस्थेच्या प्रस्तावित पुनर्वसन झोपडपट्टी पुनर्विकास (SRA) योजनेची सविस्तर माहिती रहिवाशांना देण्यात आली.

**या सभेत प्रामुख्याने विषयांवर चर्चा करण्यात आली.**

१) संस्थेमार्फत आतापर्यंत SRA योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या कामाचा आढावा.




२) जमिनमालक व विकासक मेसर्स रोजवॉल्ट रेडियेट होम्स यांनी राबविलेल्या SRA योजनेसंदर्भातील कामाची माहिती.

या विषयांवर राम कोंढाळकर, मिलिंद पवार तसेच मुख्यप्रवर्तक नरेश मोरे यांनी सविस्तर मार्गदर्शक केले, रहिवाशांच्या मनातील शंका, प्रश्न व गैरसमज यांचे समाधानकारक निरसन करण्यात आले.

या सभेला श्री. राजेश दळवी ( भू. माफक) तसेच विकासक रोज वर्ल्ड यांची प्रमुख उपस्थिती होती.

संस्थेच्या पहिल्याच सभेला २५० महिला व पुरुष स्थानिक सभासदांची उपस्थिती लावली. रहिवाशांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत पुनर्विकास प्रक्रियेस सकारात्मक पाठिंबा दर्शविला.

साईकृपा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या माध्यमातून होणाऱ्या पुनर्वसन प्रक्रियेबाबत पारदर्शक विस्वासार्ह माहिती मिळाल्याने उपस्थित सभासदांनी समाधान व्यक्त केले.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

युवक आधार



## उलवे मधील अनधिकृत जाहिरात होर्डिंग्ज सिडकोने पाडले

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

उलवेतील पुष्पक नगर परिसरात अटल सेतू लगत असलेल्या सव्र्हे नंबर ९२/२/२ येथील सिडको अधिसूचित व संपादित जागेवर अनधिकृतपणे उभारण्यात आलेले सहा अनधिकृत जाहिरात होर्डिंग पाडण्याची कारवाई सिडकोच्या अनधिकृत बांधकामे विभागाने केली. या सहा जाहिरात होर्डींगने सिडकोचे अंदाजे ४६२ चौ. मीटर क्षेत्रफळ जागेवर अतिक्रमण केले होते.

सदर जाहिरात होर्डींग सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करुन तसेच सिडको महामंडळाची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आले होते. त्यामुळे सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार तसेच मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली सहा अनधिकृत जाहिरात होर्डिंगवर निष्कासन कारवाई करण्यात आली. सिडको अतिक्रमण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली. अनधिकृत बांधकामे व जाहिरात फलकांमुळे शहराच्या नियोजनावर तसेच सुरक्षिततेवर विपरीत परिणाम होत असल्याने, अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सातत्याने सुरु राहणार असल्याचे सिडकोकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# बाळासाहेब ठाकरे जयंतीनिमित्त सेलू शहरात राज्यस्तरीय निमंत्रितांची क्रिकेट स्पर्धा

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी**
**शिवाजी पवार**

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त नितीन कला, क्रीडा व सांस्कृतिक युवक मंडळातर्फे सलग २६ व्या वर्षी राज्यस्तरीय 'नितीन लहाने स्मृती चषक' निमंत्रितांची क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. क्रिकेटप्रेमींमध्ये मोठी उत्सुकता निर्माण करणारी ही स्पर्धा दि. १८ ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत पार पडणार असून, राज्यातील १६ नामवंत संघ या स्पर्धेत आपले क्रिकेट कौशल्य सादर करणार आहेत.




स्पर्धेतील विजेत्या संघास २ लाख रुपये रोख, नितीन लहाने स्मृती चषक व आकर्षक ट्रॉफी देण्यात येणार असून, हे प्रथम पारितोषिक पाथरी मतदारसंघाचे आमदार मा. श्री. राजेशदादा विटेकर यांच्या वतीने प्रदान करण्यात येणार आहे. उपविजेत्या संघासाठी १ लाख रुपये रोख, नितीन लहाने स्मृती चषक व ट्रॉफी ठेवण्यात आली असून, हे पारितोषिक ओम चैतन्य प.पू. श्री. रामेश्वराय महाराज यांच्या सौजन्याने दिले जाणार आहे.

स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना विविध वैयक्तिक पुरस्कारांनी गौरविण्यात येणार आहे. मालिकावीर पुरस्कार म्हणून २५ हजार रुपये रोख पारितोषिक अरिहंत गॅस एजन्सीचे श्री. पारस काला यांच्या सौजन्याने देण्यात येणार असून, या पुरस्काराची ट्रॉफी सेलू बाजार समितीचे संचालक श्री. नामदेव आप्पा डख यांच्या वतीने प्रदान केली जाणार आहे.

प्रत्येक सामन्यातील सामनावीर पुरस्कार शिवसेना उपजिल्हाप्रमुख श्री. बाबा काटकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार असून, सन्मानचिन्ह वरद एजन्सीचे श्री. प्रशांत गोळेगावकर यांच्या सौजन्याने देण्यात येणार आहे. प्रेक्षकांसाठी दररोज लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले असून, प्रत्येक सामना यूट्यूबवर थेट प्रक्षेपित केला जाणार आहे.

खेळाडूंसाठी कोल्डड्रिंक्सची व्यवस्था श्री. अन्वरखान यांच्या सौजन्याने करण्यात आली आहे.

या राज्यस्तरीय स्पर्धेपूर्वी दि. ४ जानेवारी २०२६ (रविवार) रोजी खेळपट्टीचे उद्घाटन होणार आहे.

या स्पर्धेचे यशस्वी आयोजन शिवसेना उपजिल्हाप्रमुख, तालुका प्रमुख, तालुका संघटक, उपतालुका प्रमुख, ओबीसी, दलित व महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी, शहर व उपशहर प्रमुख, नगरसेवक तसेच शिवसेना सेलू तालुक्यातील सर्व ज्येष्ठ शिवसैनिक व पदाधिकारी यांच्या संयुक्त सहकार्याने करण्यात येत आहे.

## गिरीश कंटे यांना हुतात्मा स्मारक समितीचा " हुतात्मा गौरव २०२६ " पुरस्कार जाहीर.

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

कर्जत तालुक्याच्या इतिहासातील रक्तरंजित पान ठरलेल्या हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या बलिदानाच्या स्मृती जागविण्यासाठी स्थापन झालेल्या हुतात्मा स्मारक नेरळ ही राष्ट्रभक्तीची जाणीव असलेली संस्था दरवर्षी समाजात निःस्वार्थी भावनेतून कार्यरत असलेल्या व्यक्तींना हुतात्मा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.

यावर्षी हा पुरस्कार हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या समर्पित कार्यावर संशोधन करून क्रांती कार्याचा प्रसार आणि प्रचार केल्याबद्दल लेखक गिरीश कंटे यांना तसेच त्यांच्यासोबत चामटोली बदलापूर येथील भारतातील पहिले अपंग प्राण्यांचे अनाथालय चे



संस्थापक अध्यक्ष गणराज जैन यांना जाहीर झाले आहे.

हुतात्मा भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांच्या त्र्याऐंशी व्या बलिदान दिनी २ जानेवारी रोजी हा पुरस्कार सोहळा नेरळ येथील हुतात्मा चौकात सायंकाळी साडेपाच वाजता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या शुभहस्ते आणि कर्जत खालापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या ह्या कार्यक्रमात नेरळ येथील हुतात्मा स्मारकात उभारण्यात आलेल्या शेतकरी आणि कामगारांचे प्रतीक असलेल्या हुतात्मा स्तंभाचे लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.

" हुतात्मा गौरव २०२६ " पुरस्कार हा ज्या क्रांती लढ्याचे प्रतिबिंब समजले जाते,त्या हुतात्म्यांच्या जीवनावर आधारित गिरीश कंटे यांनी गेली पंचवीस तीस वर्षे व्यासंग पूर्वक लेखन करून आझाद दस्ता,बलिदानाचा साक्षीदार, इन्कलाब, समर्पणाची गाथा, समर्पण, समर्पणाला वंदन,स्वातंत्र्यवीर गोमाजी पाटील,क्रांती पर्व ,क्रांतिवीर धोंडू केशव देसाई ही पुस्तके लिहून खऱ्या अर्थाने हुतात्मा भाई कोतवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या क्रांती कार्यावर प्रकाशझोत टाकला आहे.विविध वृत्तपत्रात हुतात्म्यांची गाथा,अनेक स्मरणिका,ध्वनिफीत,प्रकाशित करून क्रांती कार्याचा प्रसार आणि प्रचार व्हावा ह्यासाठी ते कार्यरत आहेत.

.ह्या पुरस्कार सोहळ्यास माजी आमदार सुरेश भाऊ लाड, रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्ष सुरेश टोकरे,माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे,पोलिस उप अधीक्षक राहुल गायकवाड, कर्जतचे तहसीलदार डॉ.धनंजय जाधव,नेरळचे सहाय्यक पोलिस निरीक्षक राहुल आरोटे,कर्जत नगर परिषदेच्या नगराध्यक्षा पुष्पा दगडे,माथेरान नगर परिषदचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी,नेरळ ग्रामपंचायत चे प्रशासक सुजित धनगर हे उपस्थित राहणार आहेत. ह्या कार्यक्रमांचे औचित्य साधून भारतीय सैन्य दलातील निवृत्त जवान डॉ.कुशाग्र पटेल, ऍड रमाकांत तरे,कुमार जाधव,अर्जुन शिंदे,किरण कांबरी हे उपस्थित राहणार आहेत.

## दिग्रसमध्ये बनावट औषध विक्री; गुन्हा दाखल

### जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्याविरुध्द अन्न औषध प्रशासनाची कारवाई

**दैनिक युवक आधार**
**उमेश साखरकर दिग्रस प्रतिनिधी**

**दिग्रस :** नामांकित ऑनलाइन शॉपिंग प्लॅटफॉर्म 'फ्लिपकार्ट' वरून बनावट औषधे मागवून त्यांची विक्री करणाऱ्या दिग्रस येथील एका मेडिकल स्टोअरवर अन्न व औषध प्रशासनाने औषधांची तपासणी केली होती. नागपूर प्रयोगशाळेच्या अहवालात ही औषधे बनावट असल्याचे निष्पन्न झाल्याने, मेडिकल मालकासह फ्लिपकार्ट इंटरनेट प्रायव्हेट लिमिटेड व अन्य एका विरुद्ध दिग्रस पोलीस स्टेशनमध्ये फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्वसामान्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्याविरुध्द कारवाई झाल्याने एकच खळबळ उडाली आहे. नयन नवीनचंद गडडा (मालक, मे. श्री महावीर मेडिकल अँड जनरल स्टोअर्स, दिग्रस). मे. फ्लिपकार्ट इंटरनेट प्रा. लि. (बेंगळुरू, कर्नाटक). असे गुन्हा दाखल झालेल्या इसमाचे नाव आहे.



याप्रकरणी मनिष विश्वासराव गोतमारे अन्न व औषध प्रशासन, यवतमाळ यांनी पोलिसांत तक्रार दिली अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी मनिष गोतमारे यांनी दिग्रस येथील 'मे. श्री महावीर मेडिकल 'मध्ये औषध साठ्याची तपासणी केली. त्यांनी मेडिकल मालक नयन गडडा यांना औषधांच्या खरेदीचे बिल मागितले असता, त्यांनी सदर औषधे ऑनलाइन 'फ्लिपकार्ट' ॲपद्वारे खरेदी केल्याचे सांगितले. संशय आल्याने प्रशासनाने या औषधांचे नमुने नागपूर येथील प्रयोगशाळेत चाचणीसाठी पाठवले होते. ही घटना ३ मे २०२५ रोजी घडली होती. याप्रकरणी २६ डिसेंबर २०२५ ला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रयोगशाळेचा अहवाल आणि फसवणूक नागपूर प्रयोगशाळेकडून प्राप्त झालेल्या विश्लेषण अहवालात सदर औषधे ही 'बनावट' असल्याचे स्पष्ट झाले. आरोपी नयन गडडा यांनी या औषधांचे कोणतेही अधिकृत बिल सादर केले नाही. कोणत्याही वैध परवान्याशिवाय आणि खात्रीशिवाय बनावट औषध साठा खरेदी करून, त्याची सर्वसामान्य जनतेला विक्री करून लोकांची फसवणूक केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

# शेकापच्या वाहतूक सेल रायगड जिल्हाध्यक्ष जयेंद्र शेळके शेकडो समर्थकांसह भाजपात

### शेकापला आणखी एक जोरदार झटका

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महाविकास आघाडीच्या समोर शेकापने शरणागती पत्करली असल्याने शेकापच्या कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सूर पहायला मिळत आहे. त्यामुळे अनेक कार्यकर्ते शेकापला अखेरचा सलाम करत देशाच्या विकासाची विचारधारा असलेल्या भाजपमध्ये सहभागी होत आहेत. त्याच अनुषंगाने शेकापच्या वाहतूक सेलचे रायगड जिल्हाध्यक्ष व माजी ग्रामपंचायत सदस्य जयेंद्र बबन शेळके यांनी शेकडो समर्थकांसह आज भाजपात जाहीर प्रवेश केला. कालच रोडपाली येथील प्रवेशाच्या धक्क्यातून सावरत नसताना आणखी एक मोठा धक्का शेकापला मिळाला आहे.



लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल नहानगरपालिका निवडणूक प्रमुख आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते त्यांचे स्वागत करून प्रवेश देण्यात आला. यावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, वासुदेव घरत, पूर्व मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, प्रभाकर जोशी, प्रल्हाद गायकर, सचिन वास्कर, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. शेकापच्या वाहतूक सेलचे रायगड जिल्हाध्यक्ष व माजी ग्रामपंचायत सदस्य जयेंद्र बबन शेळके यांच्यासोबत ओवे, रांजणपाडा, ओवेकॅम्प, सेक्टर २७, सेक्टर ३४, सेक्टर ३५, भागेश्री सोसायटी, रोहींजण येथील अनेक कार्यकर्त्यांनी त्यांच्या समर्थकांसह भाजपात प्रवेश केला. त्यामध्ये जगदीश शेळके, लहू शेळके, महेंद्र शेळके, अशोक शेळके, कैलास शेळके, भावेश शेळके, कुणाल शेळके, सुभाष शेळके, सुनिल शेळके, हर्ष शेळके, समीर वाघमारे, शादाब शेख, तन्वीर शेख, आफताब शेख, सुफियान शेख, कैलास वास्कर, प्रभाकर वास्कर, महेश वास्कर, संतोष घरत, प्रशांत जोशी, शंकूनाथ गडगे, केतन म्हात्रे, पंढरीनाथ भाग्यवंत, चंदू भोपी, राजन चौधरी, खुटाराम चौधरी, प्रेमाराम चौधरी, बगदराम चौधरी, प्रकाश चौधरी, उमेशराम चौधरी, नेनाराम चौधरी, योगेश भीमराव जाधव, रोहित चव्हाण, दीपक भातोसे, सुशांत साळुंखे, गणेश जाधव, धनंजय साळुंखे, शिवराम जाधव, निलेश जाधव, मुकेश चौधरी, वरूण कांबळे, गौतम कांबळे, लखनभाई, छोटूभाई, कमलाकर पाटील, कुंदन घरत, सिद्धार्थ केणी, जतिन केणी, पियुष खुटारकर, कुणाल खुटारकर व समर्थकांनी भाजपात जाहीर प्रवेश केला. शेकाप ध्येय धोरणे विसरून इतर पक्षाच्या कुबड्या घेऊन चालत आहे. एकेकाळी शानसे राहणाऱ्या शेकापला घरघर वाढली आहे. त्यामुळे शेकापने महाविकासआघाडी समोर एकप्रकारे नांगी टाकली असल्याने शेकापच्या कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम नाराजीचा सूर उमटत आहे. शेकापची आजची अवस्था बिकट झाल्याने शेकापला इतर पक्षांच्या छायेत जगण्याची सवय झाली आहे आणि हीच गोष्ट कार्यकर्त्यांच्या संतापाचे कारण ठरत आहे.

## दुसरा आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल, पुणे अध्यक्षपदी कांबळे काकासाहेब यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे**

दिनांक 2 जानेवारी ते 5 जानेवारी 2026 रोजी फुलेप्रेमी विजयजी वडवेराव यांच्या संकल्पनेतून भिडेवाडा देशातील मुलींची पहिली शाळा आंतरराष्ट्रीय काव्य जागर अभियान आंतरराष्ट्रीय फुले फेस्टिवल 2026 चे एस. एम. जोशी फाऊंडेशन सभागृह,पुणे येथे आयोजन केले असून संमेलन अध्यक्ष म्हणून काकासाहेब अनिता जनार्धन कांबळे यांची निवड करण्यात आली आहे.





क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांच्या कार्यकर्तृत्वाचा प्रचार प्रसार व भारतीय संविधाना विषयी जनजागृती करण्याच्या हेतुने फुले फेस्टिवल चे आयोजन करण्यात आले आहे. स्वरचित काव्यवाचन, एकांकिका, पोवाडा, लाठीकाठी - दांडपट्टा प्रात्यक्षिक इ. कला सादरीकरण होणार आहे तसेच या फेस्टिवल मध्ये सहभागी असलेल्या सर्वांना भारतीय संविधान ग्रंथ सन्मानपूर्वक देणार असून, फुलेप्रेमी आणि संविधान दूत घडविणे हा या आंतर राष्ट्रीय फुले फेस्टिवलचा मुख्य उद्देश आहे असे फेस्टिवल चे आयोजक फुलेप्रेमी विजयजी वडवेराव यांनी सांगितले.

## खारघरमधील गोल्ड कॉईन वाईन शॉपमध्ये भीषण राडा: मद्यधुंद तरुणाने धिंगाणा घालत केली शॉपची तोडफोड

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

: खारघरमधील गोल्ड कॉईन वाईन मार्टमध्ये मद्यधुंद तरुणाने धिंगाणा घालत भीषण राडा केल्याची घटना घडली. दारूच्या नशेत असलेल्या तरुणाने रात्रीच्या सुमारास वाईनशॉपमध्ये घुसून लाकडी बांबूने नामफलक व इतर साहित्याची तोडफोड केली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे परिसरात एकच



गोंधळ उडाला.

घटनेच्या वेळी तरुणाने दुकानासमोर मोठा गदारोळ केला. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे पाहून स्थानिक नागरिकांनी हस्तक्षेप करत संबंधित तरुणाला चोप देत ताब्यात घेतले. त्यानंतर खारघर पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. खारघर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मद्यधुंद तरुणाला ताब्यात घेतले. या प्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील चौकशी सुरू आहे. या घटनेमुळे परिसरातील व्यापारी व नागरिकांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे. पोलिसांनी अशा प्रकारच्या गैरप्रकारांवर कठोर कारवाईची मागणी स्थानिकांनी केली आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करून मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# रेवदंडा मार्गावर वाहतूक कोंडीचा भडका; अपुऱ्या मनुष्यबळामुळे प्रशासन अपयशी, पर्यटक संतापले

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे/अलिबाग**
**रेवदंडा प्रतिनिधी**

ऐन नववर्ष स्वागताच्या हंगामात रेवदंडा मार्गावर वाहतूक कोंडीने पर्यटक आणि प्रवाशांना दमवले. अलिबाग-रेवदंडा रस्त्यावर खोदकाम आणि खड्ड्यांमुळे वाहनांच्या रांगा लागल्या, तर अपुऱ्या वाहतूक पोलिसांमुळे होमगार्डची मदत घ्यावी लागली. मात्र, प्रशासनाच्या हतबलतेमुळे कोंडी सोडवता आली नाही. स्थानिक नागरिकांना रस्ता साफ करावा लागला, तर पर्यटकांना तासन्तास वाट पाहावी लागली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गलथान कारभाराने शासनाच्या अपयशाचा बडगा उमटवला आहे.नववर्षाच्या जल्लोषासाठी रायगड जिल्ह्यात, विशेषतः अलिबाग-रेवदंडा-मुरुड भागात पर्यटकांची गर्दी वाढली. २७



"पर्यटन हंगामात प्रशासनाची असमर्थता उघड झाली असून, रेवदंडा गावकऱ्यांनी दिलेल्या योगदानाने प्रशासनाच्या अपयशावर बोट ठेवले गेले."

डिसेंबर ते ४ जानेवारीपर्यंत बुकिंग फुल झाल्याची माहिती आहे. सागरी मार्गासह रस्त्याने दाखल होणाऱ्या पर्यटकांना मात्र रेवदंडा हायस्कूलजवळ वाहतूक कोंडीत अडकावे लागले. अलिबाग ते बेलकडे हे दहा मिनिटांचे अंतर पार करण्यासाठी अर्धा ते एक तास, तर रेवदंडा गावापर्यंत अडीच ते तीन तास लागले. निश्चित वेळी हॉटेल्स आणि बीचला पोहोचू शकले नाहीत, त्यामुळे पर्यटकांतून संतापाच्या सूर उमटले. स्थानिकांची मदत, प्रशासनाची चूक रेवदंडा गावकऱ्यांनी वाहतूक सोडवण्यात अग्रेसर भूमिका घेतली. सामाजिक कार्यकर्ते निमिष परांसपे, नान्या आठवले, अनिकेत पाटील यांनी बाहेरील वाहनचालकांना मार्गदर्शन करून मदत केली. मात्र, जिल्ह्यातील विविध मार्गांवर कोंडी झाल्याने वाहतूक पोलिसांची दमछाक उडाली. अपुऱ्या मनुष्यबळामुळे होमगार्डची मदत घेतली, तरी यंत्रणा अपयशी ठरली. अलिबाग-वडखळ, अलिबाग-बेलकडे, चौल-रेवदंडा मार्गावर ठिकठिकाणी खड्डे आणि खोदकामामुळे वाहनांचा वेग मंदावला.

**पोलिसांचे म्हणणे**

"वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी होमगार्डची मदत घेण्यात आली. अलिबाग-वडखळ, अलिबाग-बेलकडे मार्गावर ठिकठिकाणी वाहतूक पोलिस आणि होमगार्ड तैनात केले आहेत. पर्यटनस्थळांजवळही पोलिस आहेत. खड्ड्यांमुळे वाहनांचा वेग मंदावला, तरी प्रयत्न सुरू आहेत." - अभिजीत भुजबळ, पोलीस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा.

**बांधकाम विभागाची उदासीनता**

सार्वजनिक बांधकाम विभागाने अलिबाग-रोहा सहाण बायपास ते चौल-रेवदंडा मार्गावरील खड्डे बुजवले नाहीत. पर्यटन हंगामात रुंदीकरणाच्या नावाने रस्ते खोदून ठेवले, ज्यामुळे धूळखळ आणि वाहतूक मंदावली. चालकांना तारेवरची कसरत करावी लागली. विभागाच्या गलथान कारभाराने व्यावसायिक आणि पर्यटकांना फटका बसला. स्थानिकांनी शासनाच्या अपक्षपाती धोरणावर संताप व्यक्त केला.

# अल्पवयीन मुले पळवतात सुसाट वाहने वाहतूक पोलीसांचे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**
**उमेश साखरकर दिग्रस प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलांच्या हाती दुचाकी, ट्रॅक्टरसारखी जड वाहणे देण्याचा धोकादायक प्रकार परीसरात सर्रास सुरू असुन याकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांतुन होत आहे १५ ते १६ वर्षाचे मुले वाहने चालवताना दीसत आहे काही पालक मुलाची हौस पुर्ण करण्यासाठी वाहणे चालवायला देत आहेत कमी पैशात मिळत असल्याने अल्पवयीन मुले ट्रॅक्टर भरपूर प्रमाणात चालवताना दिसत आहे सर्व काही नियम माहीत असुन सुद्धा पालक अनभिज्ञ असल्याचे दाखवत असुन वाहतूक पोलीसांचे याकडे दुर्लक्ष होताना दिसत आहे कडक व नियमानुसार कारवाई होत नसल्याने अल्पवयीन मुलांचे वाहणे चालवण्याची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे अल्पवयीन मुलगा वाहण चालवताना आढळयास पालकांना २५ हजारांचा दंड व तीन वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा होऊ शकते. विध्यार्थी शाळा महाविद्यालयात जाण्यासाठी दुचाकीचा वापर करीत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे अल्पवयीन मुलांच्या हाती वाहनं नकोच अल्पवयीन मुलांना शाळेत जाण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीची सुविधा आहेच त्यांना वाहन चालवताना वेग मर्यादाही लक्षात येत नाही व अपघात होतात यात पालकांना मोठा त्रास सहन करावा लागतो त्यामुळे अल्पवयीन मुलांच्या हाती वाहनं देणे पालकांनी टाळावे मोटर वाहन कायदा



१९८८ व केंद्रीय मोटर वाहन नियम १९८९ मध्ये नमुद केल्याप्रमाणे १८ वर्षांखालील मुलगा वाहन चालवताना आढळयास वाहनं मालकाला शिक्षा होऊ शकते मात्र तसे कुठेही होताना दिसत नाही भरधाव वेगाने चालवण्याचे नादात सामान्य नागरीकांचा जीव धोक्यात सापडला आहे.अपघात टाळण्यासाठी आवश्यक असलेली प्रतिबंधात्मक कारवाई होताना दिसत नाही एखादा मोठा अपघात होण्यापूर्वी प्रशासनाने तात्काळ मोहीम राबवुन अल्पवयीन मुलासह परवाना नसलेल्या चालकांवर कारवाई करावी अशी मागणी नागरीक करीत आहे

# तरुणाईची आवडती 'सबसे कातिल' गौतमी पाटीलची रसायनीत २९ डिसेंबरला दमदार एन्ट्री

**दैनिक युवक आधार**
**रसायनी: वार्ताहर**

रसायनी कला, क्रीडा व सांस्कृतिक महोत्सव २०२५ अर्थात रसायनी युथ फेस्टिव्हल सध्या संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण करत असून, या महोत्सवात आज २९ डिसेंबर रोजी होणाऱ्या 'सबसे कातिल' गौतमी पाटीलच्या बहारदार कार्यक्रमाकडे संपूर्ण रसायनीकरांचे लक्ष लागले आहे.

रविवार दि.२१डिसेंबर ते शनिवार दि.४ जानेवारी या कालावधीत सुरू असलेल्या या भव्य महोत्सवाअंतर्गत सोमवार दि.२९ डिसेंबर रोजी सायंकाळी ठीक ७ वाजता मोहोपाडा येथील अचानक क्रिकेटच्या भव्य मैदानावर गौतमी पाटीलचा रंगतदार, जल्लोषपूर्ण व तरुणाईला भुरळ घालणारा नृत्याविष्कार सादर होणार आहे.

विशेष म्हणजे,प्रथमच गौतमी पाटील रसायनी परिसरात आपली एन्ट्री करत असल्याने तरुण-तरुणाईसह महिला,कुटुंबीय आणि सर्वसामान्य रसिकांमध्ये प्रचंड उत्सुकता पाहायला मिळत आहे. सोशल मीडियावर धुमाकूळ घालणारी, लाखोंच्या चाहत्यांची मनं जिंकणारी गौतमी पाटील प्रत्यक्ष रसायनीत सादरीकरण करणार असल्याने या कार्यक्रमाला ऐतिहासिक गर्दी होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

'सबसे कातिल' अदांनी, लोकप्रिय लावणी-गीतांवरील थिरकत्या पावलांनी आणि ऊर्जेने भरलेल्या सादरीकरणामुळे गौतमी पाटीलने अल्पावधीतच महाराष्ट्रभर आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे.तिचा प्रत्येक कार्यक्रम म्हणजे जल्लोष,टाळ्यांचा कडकडाट आणि चाहत्यांचा जलद प्रतिसाद,हे समीकरण यावेळीही रसायनीत पाहायला मिळणार असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

रसायनी युथ फेस्टिव्हलच्या आयोजकांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था, प्रकाशयोजना, ध्वनीव्यवस्था व वाहतूक नियोजन यावर विशेष भर दिला असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा,असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष संदीप म्हात्रे व त्यांच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आले आहे.


एकूणच,२९ डिसेंबरची संध्याकाळी रसायनीसाठी अविस्मरणीय ठरणार असून, 'सबसे कातिल' गौतमी पाटीलच्या धमाकेदार एन्ट्रीमुळे रसायनी युथ फेस्टिव्हल २०२५ आणखी गाजणार, यात शंका नाही.

# पेण खारपाडा दुश्मि परिसरात रेल्वेच्या धडकेने बिबट्याचा मृत्यू.

## प्रशासकीय अधिकारी व वन विभाग यांच्या नाकर्तेपणामुळे, पेण तालुक्यातील जंगल तोडीमुळे वन्यप्राणी शहरांमध्ये.

**दैनिक युवक आधार**
**पेण दीपक लोके**

पेण तालुक्यात सध्या बिबट्या मानवी वसाहतीत येत असल्याने दहशतीचे वातावरण असतानाच, खारपाडा दुष्मी परिसरात एका बिबट्याचा रेल्वेच्या जोरदार धडकेत मृत्यू झाल्याची घटना घडली. शनिवारी सकाळी खारपाडा–सावरोली रस्त्यालगत असलेल्या रेल्वे रुळांजवळ बिबट्या मृतावस्थेत आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.



दरम्यान, खारपाडा दुष्मी हा जंगलालगतचा परिसर असून बाजूला खाडी आहे. वन विभाग व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे ,पेन प्रशासन जंगल असलेले डोंगर बिल्डरच्या घशात घालत असल्यामुळे पेण तालुक्यात असलेले वन्यप्राणी शहरात खाद्यपदार्थासाठी येत असून त्याचाच एक भाग म्हणून आज बिबट्या त्याच्या शिकार झाला असून त्याचा बिबट्याचा रेल्वेच्या धडकेने मृत्यू झाला याला जबाबदार पेनचे प्रशासकच असल्याचे चर्चा पेण तालुक्यात सुरू आहे. जंगलातील वन्यजीव पाणी व शिकार शोधण्यासाठी अनेकदा खाडीच्या दिशेने ये-जा करतात. शनिवारी सकाळी असाच एक बिबट्या रेल्वे मार्ग ओलांडत असताना धावत्या रेल्वेची त्याला जोरदार धडक बसली असावी व त्यातच त्याचा मृत्यू झाला असावा असा अंदाज स्थानिक ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी पोलिस प्रशासन व वन विभागाशी संपर्क साधला. वन विभागाचे अधिकारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून मृत बिबट्याचा पंचनामा करून पुढील कार्यवाही करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# बाळासाहेब नागरगोजे यांची अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात निवड

## मराठी साहित्याच्या सर्वोच्च व्यासपीठावर मांडली जाणार ऊसतोड कामगारांची व्यथा...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -**

साताऱ्याच्या ऐतिहासिक भूमीत १ ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीत होणाऱ्या ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासाठी पाटोदा तालुक्यातील जि.प.माध्य. शाळा थेरला येथील प्राथमिक पदवीधर शिक्षक बाळासाहेब नागरगोजे यांची साहित्यिक प्रतिभेच्या आधारे प्रतिष्ठित संमेलनातील कविकट्टा व्यासपीठावरुन कविता सादर करण्यासाठी निवड झाली आहे. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे(शाखा शाहूपुरी) व मावळा फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शाहू जिल्हा क्रीडा संकुल, सातारा येथे हे संमेलन आयोजित करण्यात आले आहे. ज्येष्ठ साहित्यिक 'पानिपतकार' विश्वास पाटील हे संमेलनाध्यक्ष असून, संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ विचारवंत डॉ.मृदुला गर्ग यांच्या हस्ते होणार आहे. समारोपाप्रसंगी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते रघुवीर चौधरी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा संमेलनाचे स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले हे आहेत. बाळासाहेब नागरगोजे यांना शालेय जीवनापासूनच वाचन व लेखनाची आवड आहे. लोकमत वर्तमानपत्रासह विविध वर्तमानपत्रे व दिवाळी अंकांतून त्यांच्या कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ (महाराष्ट्र शासन ) यांच्या अनुदानातून त्यांचा 'युध्द पेटले आहे ' हा कवितासंग्रह अलीकडेच प्रकाशित झाला आहे. अत्यंत अल्प कालावधीत हा कवितासंग्रह महाराष्ट्रभर दखलपात्र ठरला आहे. 'युध्द पेटले आहे' हा कवितासंग्रह तळागाळातील वंचित घटकांच्या व्यथांचा आक्रोश प्रभावीरित्या व्यक्त करतो. याच कवितासंग्रहातील 'साखर' या ऊसतोड कामगारांवरील कवितेची निवड संमेलनातील अनुभवी साहित्यिकांनी केली आहे. बाळासाहेब नागरगोजे यांच्या कवितेला मिळालेला हा सन्मान ही पाटोदा तालूका व बीड जिल्ह्यासाठीसुद्धा गौरवाची बाब आहे. अखिल भारतीय स्तरावरील या मानाच्या साहित्यिक व्यासपीठावर थेरला गावातील कवीची निवड झाल्याबद्दल ज्येष्ठ साहित्यिक डॉ.सुधाकर शेंडगे, ज्येष्ठ कवयित्री प्रा.ललिता गादगे, प्रा.डॉ.वीरा राठोड, एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष व मराठवाडा साहित्य परिषदेचे संचालक साहित्यिक श्री.अनंत



कराड सर, प्रा.समाधान इंगळे, साहित्यिक परशुराम सोंडगे, साहित्यप्रेमी, शिक्षक वृंद, अधिकारी वर्ग, थेरला गावाचे सरपंच श्री.चंद्रकांत (बापू) राख, उपसरपंच व ग्रामस्थांकडून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# काँग्रेसचा 'मिशन 100 नगरसेवक'चा दणदणीत शुभारंभ

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राहुल मडावी**

नागपूर : नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचा स्थापना दिवस आज दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी देवडीया काँग्रेस भवन येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरा केला. याच कार्यक्रमात नागपूर महानगरपालिका निवडणूक–२०२६ साठी काँग्रेसच्या 'मिशन १०० नगरसेवक' या महत्त्वाकांक्षी मोहिमेचा अधिकृत शुभारंभ करण्यात आला.




या प्रसंगी नागपूर शहर काँग्रेस अध्यक्ष व पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना संबोधित करताना, काँग्रेसच्या प्रत्येक कार्यकर्त्याने वैयक्तिक मतभेद बाजूला ठेवून संघटितपणे काम करावे आणि मिशन १०० नगरसेवक यशस्वी करून नागपूर महानगरपालिकेत काँग्रेसची सत्ता प्रस्थापित करावी, असे ठाम आवाहन केले.

आमदार ठाकरे म्हणाले, "गेल्या १५ वर्षांत भाजपच्या अपयशी, भ्रष्ट आणि नागरिकविरोधी कारभारामुळे नागपूर शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधांसाठीही संघर्ष करावा लागत आहे. नागपूरकरांच्या सर्व समस्यांवर ठोस उपाय देण्याची ताकद आणि इच्छाशक्ती केवळ काँग्रेसकडेच आहे. यावेळी १,५०० हून अधिक कार्यकर्त्यांनी उमेदवारी अर्ज सादर केले आहेत, मात्र जागा केवळ १५१ आहेत. त्यामुळे सर्वांनी मनाचा मोठेपणा दाखवून काँग्रेसने ज्या उमेदवारांना तिकीट दिले आहे, त्यांच्या विजयासाठी एकदिलाने काम करावे."

कार्यक्रम आमदार विकास ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी सर्वप्रथम झेंडावंदन करून काँग्रेस पक्षाच्या गौरवशाली इतिहासाला अभिवादन करण्यात आले.

स्थापना दिवसाचे औचित्य साधत, महासचिव विजय गायकी यांच्या नेतृत्वाखाली १५२ जणांनी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. आमदार विकास ठाकरे यांनी सर्व नवप्रवेशितांचे काँग्रेसचा दुपट्टा परिधान करून मनापासून स्वागत केले.

या कार्यक्रमाला आमदार अभिजीत वंजारी, अतुल कोटेचा, अतुल लोंढे, उमाकांत अग्निहोत्री, प्रशांत धवड, संजय महाकाळकर, गिरीश पांडव, बंटी शेळके, प्रा. दिनेश बानाबाकोडे, प्रविण आगरे, इरशाद अली, वसीम खान, रमेश पुणेकर यांच्यासह काँग्रेसचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन परमेश्वर राऊत यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. दिनेश बानाबाकोडे यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अब्दुल नियाज नाजू, शिवशंकर रणदिवे, दामोधर धर्माळे, ॲड. अभय रणदिवे, अप्पा मोहिते, परमेश्वर राऊत, निखिल धांडे, राजेश साखरकर, गोपाळ पत्तम, ॲड. विद्याधर त्रिपाठी, रीमा चव्हाण, वंदना मेश्राम, सुवर्णा धर्माळे तसेच डॉ. आघाव यांनी विशेष परिश्रम घेतले.

# प्रज्ञाचक्षु श्री संत गुलाबराव महाराज चॅरिटेबल ट्रस्टतर्फे

## सप्तदिवशीय संगीतमय श्रीराम कथा – मंडप भूमिपूजन भक्तिभावात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राकेश यादव**
**वाडी नागपूर**

प्रज्ञाचक्षु श्री संत गुलाबराव महाराज चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या सप्तदिवशीय संगीतमय श्रीराम कथा या भव्य धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमाच्या मंडप भूमिपूजनाचा सोहळा दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी अत्यंत भक्तिभावाच्या वातावरणात पार पडला. हा सोहळा मोहोड ट्रेडिंग कंपनी, उदयनगर चौक, नागपूर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



सदर मंडप भूमिपूजनाचा कार्यक्रम मा. श्री रमेशजी कोठाले (ज्येष्ठ समाजसेवक), मा. श्री अशोक येवले (अध्यक्ष, गुरुदेव सेवा मंडळ) तसेच डॉ. डी. बी. चौधरी (समाजसेवक) यांच्या शुभहस्ते पार पडला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी प्रभू श्रीरामांच्या चरित्रातून समाजाला सदाचार, सेवा, त्याग व संस्कारांची दिशा मिळते, असे मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास मा. नितीनजी चौधरी (नेते, ओबीसी मुक्ती मोर्चा), श्री अजयजी लांबट (अध्यक्ष, चिटणीसपुरा बँक), श्री भाईजी मोहोड (अध्यक्ष, प्रज्ञाचक्षु श्री संत गुलाबराव महाराज चॅरिटेबल ट्रस्ट), सुदाम शिंगणे (कार्याध्यक्ष), दिवाकर मोहोड (उपाध्यक्ष), प्रदीप अहिरे (सचिव), सौ. सुनिता मोहोड (कोषाध्यक्ष) यांच्यासह डॉ. अरुण वराडे, श्री देवराव वावरे, श्रीमती पैगवार मॅडम, सौ. बोरकर मॅडम, श्री शनिवारे, बोरकर सर, श्री दिलीपजी सुरकार तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चिंध्रणमधील नव्या शाळेसाठी रेसोनिया लिमिटेडकडून रु. ५० लाखांचा निधी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील शैक्षणिक पायाभूत सुविधा बळकट करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत रेसोनिया लिमिटेडने पनवेल यांनी तालुक्यातील चिंध्रण गावात नव्या माध्यमिक शाळेच्या इमारतीसाठी रु. ५० लाखांची आर्थिक मदत दिली आहे. ही मदत कंपनीच्या प्रमुख प्रकल्प मुंबई ऊर्जा मार्ग लिमिटेड (MUML) अंतर्गत सुधागड एज्युकेशन सोसायटीला देण्यात आली आहे. या उपक्रमामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध होणार आहेत.

या नव्या शाळा इमारतीचा भूमिपूजन सोहळा शुक्रवारी पार पडला. यावेळी भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुण शेठ भगत उपस्थित होते. त्यांनी खासगी पायाभूत सुविधा विकासक आणि स्थानिक समुदाय यांच्यातील सहकार्याचे कौतुक केले. गावचे सरपंच एकनाथ नामदेव पाटील यांनी ग्रामस्थांच्या वतीने निधी स्वीकारला.

प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान स्थानिक गरजा ओळखून, मुंबई ऊर्जा मार्ग लिमिटेडने चिंध्रण गावातील शिक्षण क्षेत्राला पाठबळ देण्याचा निर्णय घेतला. आमदार प्रशांत ठाकूर आणि गाव प्रतिनिधींच्या विनंतीनुसार





नव्या शाळेच्या इमारतीसाठी रु ५० लाखांचा भरघोस निधी देण्यात आला आहे.

रेसोनिया लिमिटेड शाश्वत विकासाच्या दिशेनेही सक्रिय असून, गुजरातमधील खावडा येथून महाराष्ट्रातील पडघा येथे हरित ऊर्जा पोहोचवणारा खावडा IV C वीज वहन प्रकल्प सध्या सुरू आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्र स्वच्छ ऊर्जेकडे आणखी एक पाऊल पुढे टाकत आहे.

पायाभूत सुविधांपुरते मर्यादित न राहता, MUML आणि रेसोनिया लिमिटेड स्थानिक नागरिकांच्या उपजीविकेलाही प्राधान्य देत आहेत. पालघर जिल्ह्यातील वाडा येथील गोवर्धन स्किल सेंटरमध्ये स्थानिक व आदिवासी भागातील ४० विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना तीन महिन्यांची सशुल्क इंटर्नशिप मिळाली असून त्यांना दरमहा रु. १४,००० स्टायपेंड दिले जात आहे.

या प्रशिक्षणामध्ये लेथ मशीन, मिलिंग मशीन, 3D प्रिंटर, CNC प्रोग्रामिंग, फ्युजन ३६० तसेच संपूर्ण मशीनिंग प्रक्रियेचे आधुनिक ज्ञान देण्यात आले. एशियन पेंट्स, ब्लू स्टार, फिबमोल्ड पॅकेजिंग लिमिटेड आणि जेराई फिटनेस यांसारख्या नामांकित कंपन्यांनी या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये सहभाग घेतला. मुंबई महानगर प्रदेशाचा वीजपुरवठा अधिक सक्षम करण्यातही MUML ची महत्त्वाची भूमिका असून, भारत सरकारच्या दृष्टीकोनानुसार कंपनीने सुमारे २,००० मेगावॅट अतिरिक्त वीज मुंबई महानगर क्षेत्रात उपलब्ध करून देण्यास हातभार लावला आहे.

प्रगती ही सुरक्षित आणि जबाबदार असली पाहिजे, या भूमिकेतून कंपनीने सेफ्टी स्टुअर्डशिप प्रोग्राम सुरू केला आहे. हा उपक्रम कौशल्य विकास कार्यक्रमाचा एक भाग असून, त्यातून युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण केल्या जात आहेत. त्याचबरोबर कार्यस्थळे आणि स्थानिक समुदायांमध्ये सुरक्षित कामकाजाच्या पद्धतींचा प्रसार करून विकासाच्या प्रक्रियेत कोणत्याही परिस्थितीत मानवी सुरक्षिततेशी तडजोड होऊ नये, याची काळजी घेतली जात आहे. शिक्षण, स्वच्छ ऊर्जा, कौशल्य विकास आणि सुरक्षितता या चार स्तंभांवर लक्ष केंद्रित करत रेसोनिया लिमिटेड समाजासोबत चालत उज्ज्वल, सुरक्षित आणि शाश्वत भवितव्य घडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे या उपक्रमांतून स्पष्ट होते.

## हर घर हरिपाठ' हर घर ब्लँकेट संकल्पनेसह कवलीत मराठा प्रतिष्ठानचा समाजोपयोगी उपक्रम...

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी**
**विजय काळे**

**सोयगाव:** -तालुक्यातील कवली येथे दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी मराठा प्रतिष्ठानच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपणारा उल्लेखनीय उपक्रम राबविण्यात आला.कवली गावात सुरू असलेल्या भागवत सप्ताहाच्या निमित्ताने मराठा प्रतिष्ठान सोयगाव तालुका व मराठा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान दादा गव्हाडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. या उपक्रमांतर्गत गावातील सर्व नागरिकांना 'हर घर हरिपाठ' या संकल्पनेचे साहित्य वाटप करण्यात आले.तसेच डिसेंबर महिन्यात सोयगाव तालुक्यात थंडीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याने सामाजिक जाणिवेतून गावातील ज्येष्ठ व वयोवृद्ध नागरिक तसेच महिला-पुरुष मिळून एकूण ८०० जणांना ब्लॅंकेटचे वाटप करण्यात आले.या उपक्रमामुळे कवली गावात समाधानाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले.हा कार्यक्रम ह.भ.प.चंद्रकांत महाराज साक्रीकर,

मराठा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष सोपान दादा गव्हाडे पाटील, माजी सभापती चंद्रकांत पाटील,मराठा प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष विजय काळे, तालुकाध्यक्ष विजय चौधरी,मा.सरपच सुरेखा ताई तायडे,कवली चे सरपंच वसंत बनकर उपसरपंच ज्योतीताई मंगेश पाटील घोसलाचे सरपंच गणेश माळी, पोलीस पाटील निवृत्ती केंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.यावेळी मराठा प्रतिष्ठानचे रवी पाटील,दिनेश पाटील,

योगेश पाटील,भीमराव पाटील, मनोज खोसे,अमोल पंडित, राहुल तराळ,श्रानेश्वर तराळ, युवराज पाटील,किशोर पाटील,

प्रमोद वाघ,ज्ञानेश्वर युवरे,तिडका येथील मुजीफ पटेल,वाकडी येथील कृष्णा धुमाळ,उपलखेडाचे गोपाल पाटील,सोनू तडवी जरंडीचे सचिन महाजन, सुनिल तिडके,चेतन पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोपान दादा गव्हाडे पाटील (संस्थापक अध्यक्ष, मराठा प्रतिष्ठान)

"धार्मिक उपक्रमांसोबत समाजातील गरजू घटकांसाठी मदतीचा हात पुढे करणे हीच मराठा प्रतिष्ठानची भूमिका आहे.सोयगाव शहरासह तालुक्यात 'हर घर हरिपाठ' आणि थंडीपासून संरक्षणासाठी ब्लॅंकेट वाटपातून समाजात सकारात्मक संदेश देण्याचा आमचा प्रयत्न आहे."

# शिवजन्मोत्सव २०२६ पूर्वतयारीचा भाग म्हणून

### किल्ले द्रोणागिरीवर दुर्ग मावळा प्रतिष्ठानची स्वच्छता मोहीम

**दैनिक युवक आधार**
**उरण प्रतिनिधी: रणिता ठाकूर**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जपत आणि शिवजन्मोत्सव २०२६ च्या पूर्वतयारीचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून दुर्ग मावळा प्रतिष्ठान – उरण विभाग यांच्या वतीने किल्ले द्रोणागिरी, उरण येथे स्वच्छता व सफाई मोहीम उत्साहात राबविण्यात आली.

रविवार, दिनांक २८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८ ते ११ वाजेपर्यंत पार पडलेल्या या मोहिमेत शिवप्रेमी युवक-युवती, स्थानिक शिवभक्त तसेच प्रतिष्ठानचे मावळे मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

"किल्ले हे केवळ दगड-मातीचे अवशेष नसून ते आपला इतिहास, स्वाभिमान आणि प्रेरणास्थान आहे" या भावनेतून ही मोहीम अत्यंत नियोजनबद्ध व यशस्वीपणे राबविण्यात आली.

या स्वच्छता मोहिमेदरम्यान

गडावर उगवलेली अनावश्यक काटेरी झुडपे व वनस्पती काढून टाकण्यात आली, गडावरील प्लास्टिक व इतर कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली, शिवजन्मोत्सवाच्या दिवशी निघणाऱ्या पालखी मार्गाची साफसफाई करून वहिवाट सुलभ करण्यात आली, किल्ल्यावर ज्या ठिकाणी शाहिरी पोवाड्याचे सादरीकरण होते त्या परिसरातील वाढलेली झाडाझुडपे काढून तो परिसर स्वच्छ करण्यात आला. या उपक्रमाच्या माध्यमातून स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि ऐतिहासिक वारसा जपण्याचा महत्त्वपूर्ण संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला.


दुर्ग मावळा प्रतिष्ठानच्या वतीने शिवभक्तांना आवाहन करण्यात आले की, शिवजन्मोत्सव हा केवळ उत्सव म्हणून न साजरा करता तो सेवा, शिस्त आणि संस्कारांचा उत्सव म्हणून साजरा करावा.या मोहिमेसाठी दुर्ग मावळा प्रतिष्ठानचे अध्यक्ष चंद्रशेखर भोमकर यांनी सहकार्य करणाऱ्या सर्व शिवभक्त, स्वयंसेवक व मावळ्यांचे प्रतिष्ठानच्या वतीने मनःपूर्वक आभार मानले.

या मोहिमेत विशेषतः मुंबई येथील शिवभक्त अरविंद कदम, खोपटे येथील फिटनेस ट्रेनर दिनार पाटील, शिवभक्त सुरज घरत, धीरज पाटील तसेच दुर्ग मावळा प्रतिष्ठान – उरण विभागाचे सर्व मावळे उपस्थित होते.

जय जिजाऊ! जय शिवराय! जय शंभूराजे!







## शेतकरी समाजाचे ज्येष्ठ मार्गदर्शक कै.सिताराम पाटील यांचे वयाच्या १०० व्या वर्षी निधन....

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे**

सोयगाव:- तालुक्यातील पिंप्री (माळेगांव) येथील ज्येष्ठ, शतायुषी व आदर्श शेतकरी कै. सिताराम नारायण पाटील (वय १०० वर्षे) यांचे दि. २७ डिसेंबर २०२५ रोजी शनिवारी सकाळी १०.०५ वाजता वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.कै.सिताराम पाटील यांनी संपूर्ण आयुष्य शेती, कुटुंब व समाजसेवेस अर्पण केले.कष्ट,प्रामाणिकपणा आणि साधी जीवनशैली हीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख होती.पारंपरिक शेतीला शिस्त व सातत्याची जोड देत त्यांनी अनेक पिढ्यांना शेतीचे संस्कार दिले.पंचक्रोशीत ते नेहमीच मार्गदर्शक,समंजस आणि स्नेही व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते.

शेतीबरोबरच सामाजिक सलोखा,

आपुलकी आणि माणुसकी जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचा विशेष आदर होता.गावातील सामाजिक,धार्मिक व सार्वजनिक उपक्रमांत त्यांचा सहभाग प्रेरणादायी ठरत असे.त्यांच्या दीर्घायुष्यामुळे त्यांनी मुलगे,मुली,नातवंडे व पणतू असा मोठा परिवार पाहिला.

त्यांच्या पश्चात तीन मुले –भगवान पाटील, शरद पाटील व विष्णू पाटील,

मुली,नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने पाटील परिवारासह संपूर्ण पिंप्री (माळेगांव) परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.त्यांचा सारीचा नेम दि.२९ डिसेंबर २०२५ रोजी सोमवारी सकाळी ९ वाजता,दशक्रिया विधी दि. ०५ जानेवारी २०२६ रोजी सोमवारी,तर गंधमुक्ती / उत्तरकार्याचा कार्यक्रम दि. ०८ जानेवारी २०२६ रोजी गुरुवारी पिंप्री (माळेगांव) येथे आयोजित करण्यात आला आहे. शोकाकुल:भगवान सिताराम पाटील,शरद सिताराम पाटील,विष्णू सिताराम पाटील.......



# वाचन संस्कृतीला नवी दिशा देणारा जिल्हा ग्रंथालयाचा अभिनव उपक्रम

### जिल्हा ग्रंथालयासाठी आवडीची, उपयुक्त, ज्ञानवर्धक व प्रेरणादायी पुस्तके सुचवावीत

**जिल्हा प्रशासनाचे आवाहन**
**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी**

**वाशिम,** (जिमाका) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्राम गृहाच्या पाठीमागे, सिव्हिल लाईन कडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावर सुसज्ज जिल्हा ग्रंथालय आहे. जिल्हा ग्रंथालयात जवळपास ६० हजार पुस्तके उपलब्ध आहेत. (https://eg4.nic.in/OPAC/Default.aspx?CL_NAME=DOLMH) या लिंकवर क्लिक केल्यास वाशिम जिल्हा निवड करून ग्रंथालयात असलेल्या पुस्तकाची यादी बघता येते.

जिल्ह्यामध्ये वाचन संस्कृतीस चालना मिळावी यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे.

वाचन संस्कृतीचा प्रसार, ज्ञानवृद्धी आणि समाजाच्या बौद्धिक विकासासाठी ग्रंथालये ही अत्यंत महत्त्वाची केंद्रे आहेत. बदलत्या काळात वाचकांच्या आवडी-निवडी, अभ्यासाच्या गरजा आणि ज्ञानाच्या क्षेत्रात होणारे नवनवीन बदल लक्षात घेऊन ग्रंथसंपदा अद्ययावत करता येते. या उद्देशाने वाचकांकडून त्यांच्या अवाडीच्या पुस्तकांना सुचविण्याचा नविन उपक्रम राबविण्यात येत आहे.

जिल्हा ग्रंथालयामध्ये वरील यादिव्यतिरिक्त वाशिम जिल्ह्यातील रसिक वाचकांची आवडीची, उपयुक्त व प्रेरणादायी पुस्तके अजून जास्त संख्येने उपलब्ध करून देण्याचा जिल्हा प्रशासनाचा मानस आहे. तरी या गूगल फॉर्मद्वारे जिल्ह्यातील साहित्यप्रेमी नागरिक, विद्यार्थी तसेच सर्व वयोगटातील वाचकांनी त्यांना अपेक्षित असणारी दर्जेदार पुस्तके सुचवावीत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

ज्या पुस्तकांसाठी जास्त वाचकांची पसंती असेल आणि शासकीय निकषानुसार शक्य असेल अशी जास्तीत जास्त नवीन पुस्तके उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल.

ग्रंथालयासाठी पुस्तक प्रस्तावासाठी (https://tinyurl.com/washimlibrary)

या लिंक वर क्लिक करुन किंवा सोबत दिलेला QR Code

स्कॅन करुन देखील पुस्तकाचे नाव नोंदविता येईल.

हा गुगलफॉर्म ग्रंथालयासाठी वाचकांकडून पुस्तकांच्या सूचना / प्रस्ताव गोळा करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. कृपया पुस्तक सुचविताना पुस्तकाचे नाव, लेखकाचे नाव, पुस्तकाविषयी चार शब्द ही माहिती अचूक व पूर्णपणे नमूद करावी.असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# डीग्रसमध्ये अवैध दारूविक्री करणाऱ्यांचे आता खैर नाही

### आमदार अब्दुल सत्तारांचा पोलिसांना 'ऑन द स्पॉट' दणका!

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** तालुक्यातील डीग्रस येथील अवैध दारूविक्रीमुळे बिघडत चाललेले सामाजिक स्वास्थ्य आणि तरुणांचे उद्ध्वस्त होणारे भविष्य लक्षात घेता, आमदार अब्दुल सत्तार यांनी पोलीस प्रशासनाला कडक शब्दांत सुनावले आहे. "गावातील अवैध दारूविक्री तातडीने बंद करा, अन्यथा गय केली जाणार नाही," अशा स्पष्ट सूचना देत त्यांनी अजिंठा पोलिसांना धडाकेबाज कारवाईचे आदेश दिले आहेत.

शुक्रवारी (दि. २६) डीग्रस येथे विविध विकासकामांच्या लोकार्पण सोहळ्यासाठी आमदार अब्दुल सत्तार आले होते. यावेळी त्यांनी गावातील महिलांशी संवाद साधला



असता, महिलांनी अत्यंत संतप्त भावना व्यक्त करत गावातील अवैध दारूचा प्रश्न मांडला. दारूमुळे अनेक सुखी संसार उघड्यावर पडत असल्याची व्यथा महिलांनी मांडताच आमदारांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली.

आमदार सत्तार यांनी कार्यक्रमाच्या ठिकाणाहूनच अजिंठा पोलीस ठाण्याचे एपीआय अमोल ढाकणे यांना फोन लावला. "गावात बिनधास्तपणे सुरू असलेली अवैध दारूविक्री कायदा-सुव्यवस्थेला धोका ठरत आहे. तातडीने छापे टाकून दोषींवर गुन्हे दाखल करा आणि वारंवार हा धंदा करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा," असे आदेश त्यांनी फोनवरच दिले. आमदारांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहेत.

**माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय राहणार**

यावेळी बोलताना आमदार सत्तार म्हणाले की, "अवैध दारूमुळे तरुण पिढी बरबाद होत आहे. हा सामाजिक कलंक पुसण्यासाठी नागरिकांनीही पुढाकार घ्यावा. जिथे कुठे अवैध विक्री सुरू असेल, त्याची माहिती पोलिसांना द्या, माहिती देणाऱ्याचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवले जाईल."

एपीआय अमोल ढाकणे यांनी आमदारांना आश्वासन दिले की, डीग्रससह परिसरात अवैध दारूविक्रीविरोधात विशेष मोहीम राबवण्यात येईल आणि कोणत्याही परिस्थितीत हे अवैध धंदे चालू दिले जाणार नाहीत. आमदारांच्या या तत्पर निर्णयाचे डीग्रस येथील महिला आणि ग्रामस्थांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले.

# पोखरा योजनेतील भ्रष्टाचाराची मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

## जिल्हाधिकाऱ्यांनी दिले चौकशीचे आदेश

## मोठा गैरप्रकार उघड होण्याची शक्यता

**दैनिक युवक आधार**
**रिसोड. प्रतिनिधी.**

**रिसोड :** जिल्ह्यात सन २०१९ ते २०२४ या कालावधीत राबविण्यात आलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प ( पोखरा ) भाग - १ या योजनेत लाखों रुपयांचा गैरप्रकार झाला असल्याची ३३ पानांची पुराव्यासहित तक्रार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी वाशिम यांनी तात्काळ दखल घेऊन जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी वाशिम यांना एका पत्रान्वे सखोल चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. परिणामी जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी यांनी सबंधित अधिकाऱ्यांना सदर तक्रारीतील मुद्द्यांची सखोल चौकशी करून आठ दिवसांत चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

प्राप्त माहितीनुसार, रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील शेतकरी वसंत रामराव खडसे




यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ३३ पानांची पुराव्यासहित तक्रार दाखल केली आहे. तद्वतच सदर तक्रारीच्या प्रतिलिपी राज्याचे प्रधान सचिव मुंबई, कृषी संचालक पुणे, सहसंचालक अमरावती आणि जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम आदी प्रशासकीय वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने पदसिद्ध विशेष कार्य अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांनी सदर गंभीर तक्रारीची सखोल चौकशी करून कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी उपविभागीय कृषी अधिकारी वाशिम यांच्याकडे सदर चौकशीची जबाबदारी दिली आहे. सदर तक्रारीत तक्रारदार यांनी म्हटले आहे की, पोकरा योजने अंतर्गत शेलुखडसे येथील शेतकरी ज्ञानेश्वर गजानन खडसे आणि त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींनी मोठ्या प्रमाणात गैरप्रकार करून शासनाची फसवणूक केली आहे. विशेष करून शेतकऱ्यांसाठी सदर

*वस्तुस्थितीची योग्य तपासणी झाल्यास मोठे घबाड समोर येणार..*
रिसोड तालुक्यातील पोकरा भाग एक मध्ये समाविष्ट असलेल्या अनेक गावात हीच बोंब असल्याची चर्चा जोर धरत आहे. अनेक गावातील पात्र लाभार्थ्यांना डावलून ठराविक दामाजीपंतांनाच बोगस लाभ दिला असल्याचे पुरावे समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर शेलुखडसे येथील गंभीर तक्रारीची योग्य तपासणी करून पारदर्शक चौकशी केल्यास मोठे घबाड समोर येणार असल्याचे बोलले जात आहे. शिवाय यातील दोषींवर फसवणुकीचे गुन्हे दाखल करून योग्य ती कारवाई केली तर, नुकत्याच सुरू झालेल्या पोखरा भाग दोन तरी सुरळीत पार पडेल. आणि खऱ्या लाभार्थ्यांनाच लाभ मिळेल असे सुध्दा सुज्ञ लोक बोलत आहेत.

योजना एक वरदान ठरणारी आहे. मात्र काही भ्रष्ट कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी स्वतःच्या आर्थिक स्वार्थापाई योजनाच पोखरून टाकली आहे. एकीकडे विविध निकष लावून आणि त्रुटी काढून खऱ्या लाभार्थी शेतकऱ्यांना योजनेच्या लाभांपासून वंचित ठेवले. तर दुसरीकडे एकाच कुटुंबात लाखों रुपयांचा लाभ दिला आहे. त्याच धर्तीवर शेलुखडसे येथील ज्ञानेश्वर खडसे याने स्वतःच्या नावावर व वडील,भाऊ आणि आई यांच्या नावावर लाखों रुपयांचे अनुदान लाटले आहे. तर त्यात एकाच नावावर अनेक घटकांचा डबल लाभ घेतला आहे. विशेष बाब म्हणजे गट क्रमांक ६३३ मध्ये वडिलोपार्जित जुनी विहीर असताना आईच्या नावावर पोकरा योजनेतून गैरप्रकारे नवी विहीर घेतली आहे. तर ही नवी विहीर खोदण्याआधीच आई व वडिलांच्या नावावर गट क्रमांक ६३३ मध्ये कुठलेही फळझाड न लावता फळबाग लागवडीच्या नावाखाली लाखों रुपयांचे अनुदान हडपले आहे. इतकेच नव्हे; तर या महाशयाने शेलुखडसे येथील त्यांच्या मालकीच्या गट क्रमांक ६०२ ला लागून असलेल्या ग्राम पंचायत गावठाण हद्दीत अतिक्रमण करून सरकारी जागेत विहीर खोदली आहे. आणि गैरप्रकाराचा महाप्रताप म्हणजे

या आधी जालना, संभाजी नगर, बुलढाणा आणि अकोला जिल्ह्यात तक्रारीवरून तपासणी व चौकशी केली असता शेडनेट अनुदान, गोदामे, शेतमाल सुकवणी केंद्र, औजारे बँक इत्यादींच्या अनुदान वाटपात मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याचे सिद्ध झाले आहे. सदर चौकशी समितीने केलेल्या तपासणीत ५६ लाख गैरप्रकार आढळून आले होते. त्याच धर्तीवर आपण ३३ पानांची पुराव्यासहित तक्रार केली आहे. माझ्या गंभीर तक्रारीची सखोल व पारदर्शक चौकशी होईल अशी अपेक्षा आहे !
---- वसंत रामराव खडसे
( तक्रारदार शेतकरी, शेलुखडसे )

सदर अतिक्रमित विहीर खाजगी सात बारावर नोंद करून घेतली आहे. आणि त्याच विहीरीच्या भरवशावर पोकरा योजनेतून १५ ते १६ लाख रुपयांचे नेटशेड घेतले आहे. पाईप लाईन, आणि महाडीबीटी मधून कृषीच्या अनेक योजनांचा गैरप्रकारे लाभ घेतला आहे. याबाबत तक्रारदार वसंत खडसे यांनी जिल्हाधिकारी वाशिम,उपविभागीय अधिकारी वाशिम आणि तहसीलदार रिसोड यांना निवेदनाद्वारे तक्रार दिली होती. मात्र सदर प्रकरणात कोणीही दखल न घेतल्यामुळे आपण थेट राज्याचे मुख्यमंत्री आणि प्रधान सचिव व ईतर वरिष्ठ स्तरांवर तक्रार दाखल केली असून,सदर गंभीर गैरप्रकाराची सखोल चौकशी करावी व संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी केली आहे. त्या अनुषंगाने उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके यांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचे पत्र जाक्र/जिअकृअ/तांशा/नादेकृसंप्र/४८१५/२०२५ दि.११ डिसेंबर २०२५ व ३३ पानांची पुराव्यासहित तक्रार नुसार तंत्र अधिकारी अनिल राठोड यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. सदर कारवाई ८ दिवसाच्या आत करण्यात यावी जेणेकरून वरिष्ठ कार्यालयास चौकशी अहवाल विहीत वेळेत सादर करता येईल असे नमूद करण्यात आले आहे.

### उमरी शहरातील सौ.जयश्री अनिल नगनूरवार आर्य वैश्य समाजाच्या उमेदवाराचा पराभव

**दैनिक युवक आधार**
**उमरी वार्ताहर**

उमरी नगरपालिका निवडणुकीत आर्य वैश्य समाजाच्या अंतर्गत गटबाजी वादामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार असलेल्या सौ.जयश्री अनिल नगनुरवार यांचा अवघ्या 17 मतांनी पराभव झाला. त्यांच्या जागी भाजपाच्या सायली संजय कुलकर्णी हया निवडून आल्या. पराभव झालेल्या सौ.जयश्री अनिल नगनूरवार यांचा पराभव समाजातील श्रीमंत गटाच्या गटबाजीने एका सामान्य कार्यकर्त्याचा पराभव केला. अनिल सावकार नगनुरवार हे अतिशय मनमिळावू व प्रामाणिक सर्वांच्या सुख दुःखात धावून जाणारे व्यक्तिमत्व आहेत. त्यांच्या पराभवासाठी, आर्य वैश्य महासभा, व उमरी शहरातील आर्य वैश्य समाज हेच मुख्य जबाबदार आहेत.पक्ष कुठलाही असो पण एका सामान्य कार्यकर्त्याच्या पाठी राहून त्यांना निवडून देणे ही समाजाची जबाबदारी होती. पण हे कार्य आर्य वैश्य समाजाने न करता समाजाने विश्वासघात करत पराभव केल्याचा सौ.जयश्री अनिल नगनुरवार यांनी वार्ताहराशी बोलतांना सांगितले .

आर्य वैश्य समाजाच्या अंतर्गत गटबाजीमुळे सौ.जयश्री अनिल नगनुरवार या उमेदवारांचा पराभव झाल्याची चर्चा सध्या शहरात होत आहे. यामुळे नगर पालिकेत नगरसेवक म्हणून प्रतिनिधित्व करण्यासाठी या समाजाचा एकही नगरसेवक नाही. आर्य वैश्य समाजाचे शहरात सहाशे मतदार आहेत. समाजाच्या लोकांच्या अंतर्गत वादामुळे उमेदवारांचा गेम केल्याची सध्या खमंग चर्चा होत आहे. तसेच राष्ट्रवादीच्या गोरठेकर गटाकडून सौ.जयश्री अनिल नगनुरवार यांचे नगरपालिकेत स्वीकृत सदस्य म्हणून पुनर्वसन करणार का अशी चर्चा होत आहे.

### महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलिसांची धडक कारवाई; 1 पिस्टल सह 6 जिवंत काडतुसे केले जप्त

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलिसांनी शहरातून १ पिस्टल सह ६ जिवंत काडतुसे जप्त करून एकाला अटक केली आहे.

पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीत महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने गोपनीय बातमीदाराच्या बातमीच्या आधारे पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात साफळा लावून एक इसमास पिस्टल व 6 जिवंत काडतुसाह मिळून आल्याने त्यास ताब्यात घेतले. अनंथ अधिमुलम पाडायची (वय-३६ रा सानपाडा) असे या इसमाचे नाव असून त्याच्यावर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कामगिरी वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्ग्दर्शनाखाली सपोनी सचिन पोवार, सपोनि सुनील वाघ, पोउपनि किरण राउत, पोहवा प्रवीण पवार, पोना भोसले, पोशि काकडे, पोशि कराड, पोशि लोखंडे यांनी केली





### करंजाडे येथील शाळेचे मैदान नागरिकांसाठी केले खुले, जिल्हाप्रमुख विनोद साबळे यांचे प्रयत्न यशस्वी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**


: करंजाडे येथील सेकटर ३, कोठारी इंटरनॅशनल स्कूलच्या पाठीमागे असलेले खेळाचे मैदान शिवसेना शिंदे गटाच्या माध्यमातून नागरिकांसाठी खुले करण्यात आले. मुलांना खेळण्यासाठी मैदान उपलब्ध झाल्याने नागरिकांनी शिंदे सेनेचे उरण विधानसभा प्रभारी जिल्हाप्रमुख विनोद साबळे यांच्यासह पदाधिकाऱ्यांचे धन्यवाद मानले.

शाळेचे मैदान शाळा संपल्यानंतर आणि सुट्टीच्या दिवशी तेथील स्थानिकांना, मुलांना खेळण्यास मिळावे असा सिडकोचा नियम आहे. मात्र बऱ्याच ठिकाणी त्या ठिकाणी सिडकोच्या या नियमाला बगल दिली जात आहे. कोठारी इंटरनॅशनल स्कूल, करंजाडे या शाळेच्या मागील खेळाचे मैदान देखील शाळेच्या वेळेव्यतिरिक्त इतर मुलांना खेळण्यासाठी दिले जात नसल्याच्या तक्रारी शिवसेना शिंदे गटाचे विनोद साबळे यांच्याकडे आल्या होत्या. त्यानुसार त्यांनी शाळेशी संपर्क साधला आणि




शाळेच्या वेळेनंतर हे मैदान येथील स्थानिकांना, मुलांना खेळण्यासाठी मिळावे अशी मागणी केली. अखेर रविवार २८ डिसेंबर रोजी हे मैदान येथील स्थानिकांना, मुलांना खेळण्यासाठी खुले करण्यात आले. यावेळी मुलांच्या पालकांनी तसेच मुलांनी शिवसेना शिंदे गटाचे आभार मानले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख विनोद साबळे, शहरप्रमुख मिरेंद्र शहारे, महिला शहरप्रमुख अंजु सिंह, महिला शहर संपर्कप्रमुख अर्चना शिद्रुक, सेक्टर-४ शाखाप्रमुख राजाभाऊ नलावडे, उप शाखाप्रमुख राहुल सुखसे, उप शाखाप्रमुख दत्ता आतकरे, वैद्यकीय शहरप्रमुख गोरखनाथ नागरगोजे यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

### संत वामनभाऊ 50 वा पुण्यतिथी सोहळा तोंडावर, गहिनीनाथ गडाकडे जाणारा रस्ता मात्र खड्डेमय
### मुख्यमंत्री साहेब हेलिकॉप्टरने येण्याएवजी गाडीने या व रस्त्याची वाट लागलेली पहा



**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**

चिचोली येथील श्री क्षेत्र गहिनीनाथ गडावर संत वामनभाऊ यांचा ५० वा पुण्यतिथी सोहळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. हा सोहळा राज्यातील भाविकांसाठी श्रद्धेचा कार्यक्रम मानला जातो. या पुण्यतिथी सोहळ्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री उपस्थित राहणार असल्याने कार्यक्रमाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मात्र एवढ्या मोठ्या व प्रतिष्ठेच्या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवरही गहिनीनाथ गडाकडे जाणाऱ्या रस्त्याची अवस्था अत्यंत खराब आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून उखडलेला डांबराचा थर या मुळे वाहनचालकांसह पायी जाणाऱ्या भाविकांनाही मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांसाठी हा रस्ता धोकादायक ठरत आहे. हजारो भाविक या पुण्यतिथी सोहळ्यासाठी गडावर येणार असताना आणि मान्यवरांची उपस्थिती निश्चित असतानाही रस्त्याच्या दुरुस्तीकडे संबंधित यंत्रणांचे दुर्लक्ष होत असल्याची भावना ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर "मुख्यमंत्री साहेबांनी हेलिकॉप्टरने येण्याऐवजी गाडीने यावे व गहिनीनाथ गडाकडे जाणाऱ्या रस्त्याची दयनीय अवस्था प्रत्यक्ष अनुभवावी" अशी मागणी ग्रामस्थ व भाविकांकडून होत आहे. पुण्यतिथी सोहळ्यापूर्वी तातडीने रस्त्याची दुरुस्ती करून सुरक्षित वाहतुकीची व्यवस्था करावी.

### राज्यस्तरीय अधिवेशनात पत्रकारांची उपस्थिती प्रेरणादायी युवा ग्रामीण पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार

**निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ,पुणे येथील राज्यस्तरीय अधिवेशन व पुरस्कार वितरण सोहळा**

**दैनिक युवक आधार**
**श्रीक्षेत्र माहूरगड**
**प्रतिनिधी: सय्यद इसा**

ग्रामीण पत्रकाराला एखाद्या वृत्तपत्रात काम करताना किती अडीअडचणींचा सामना करावा लागतो तसेच पत्रकारिता करीत असताना समाजातील समाजकंटकांकडून पत्रकार बांधवांवर होणारे भ्याड हल्ले या सर्व बाबीची दखल घेऊन युवा ग्रामीण पत्रकार संघाची मुहूर्तमेढ रोवून तसेच समाजातील प्रत्येक घटकांच्या,न्याय हक्कासाठी सदैव तत्पर असलेली,भारतातील एकमेव संघटना म्हणजे युवा ग्रामीण पत्रकार संघ,आज महाराष्ट्र बरोबरच संपूर्ण देशात अग्रेसर असल्याने, महाराष्ट्र राज्यातील राज्यव्यापी अधिवेशन व पुरस्कार वितरण सोहळा २०२६ विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पुणे येथे आयोजित करण्यात आलेला आहे,तरी निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ परिवारातील सर्व पत्रकार बांधवांनी होणाऱ्या अधिवेशनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे युवा ग्रामीण पत्रकार संघांचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री गणेश भाऊ कचकलवार यांनी सांगितले.

अतिशय कमी कालावधीत फक्त महाराष्ट्रच नाही तर संपूर्ण भारतभर जिल्हा,तालुका व सर्कलनुसार आज युवा ग्रामीण पत्रकार संघ स्थापन करून जिथे छोट्या मोठ्या,ग्रामीण आणि शहरी भागातील पत्रकारांना वेगवेगळा दर्जा मिळत असल्याने,त्यांनी जि संकल्पना करून पूर्ण महाराष्ट्र तसेच भारतभरात कुठल्याही लहान मोठ्यांचा भेद नं करता



सर्व पत्रकारांना सोबत घेऊन चालण्याचा जो विडा उचलेला आहे त्यास आज खरोखरच महाराष्ट्र व देशात यश मिळाले आणि याचे खरे कारण म्हणजे निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या माध्यमातून गोर गरीब जनतेला सर्वतोपारी मदत होत असल्याने या संघटनेमध्ये राष्ट्रभरातून पत्रकार जुळलेले आहेत आणी एवढेच नव्हे तर भविष्यात संपूर्ण जगभरात निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाची स्थापना करू असे राष्ट्रीय अध्यक्ष श्री गणेशभाऊ कचकलवार यांनी यावेळी सांगितले.

समाजातील प्रत्येक घटकांच्या न्याय हक्कासाठी, गोरगरीब जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी संघटने मार्फत संपूर्ण देशभरात एक हेल्पलाइन नंबर सुरू केला असून त्या माध्यमातून 'एक कॉल प्रॉब्लेम सॉल्व' ही मोहीम राबविली जात आहे आणि त्या माध्यमातून पत्रकारांबरोबरच गोरगरीब जनतेच्या समस्यांचे निराकरण झालेले आहे. गोरगरीब जनतेचे प्रश्न सुटले पाहिजे व संपूर्ण महाराष्ट्र हा भ्रष्टाचार मुक्त झाला पाहिजे यासाठी निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ संचलित माहिती अधिकार संघ,समाजकार्य संघ,पोलीस मित्र संघ व इतर संघाच्या माध्यमातून 'गाव तिथे शाखा' अशी संघटनेची बांधणी असणार आहे.

६ जानेवारी पत्रकार दिनानिमित्त भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन,पुणे येथे राज्यस्तरीय अधिवेशन व पुरस्कार वितरण सोहळा,पुणे जिल्हा टीमच्या वतीने आयोजित करण्यात आलेला आहे, येथे पत्रकारिता क्षेत्रातील तसेच सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, क्रीडा, सांस्कृतिक, कृषी, उद्योग, साहित्य, कला, अध्यात्म, आरोग्य व इतर विविध क्षेत्रातील नाविन्यपूर्ण कार्य करणाऱ्यास विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे,त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रभरातील निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ परिवारातील सर्व पत्रकार बांधवांनी सदरील कार्यक्रमाला उपस्थित राहावे.

### हुंड्याची राक्षसी हाव गरोदर मातेच्या जीवावर; पाच महिन्यांच्या अर्भकासह विवाहितेचा अंत

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** पैशांच्या हव्यासापोटी सासरच्या मंडळींनी केलेल्या अमानुष छळाला कंटाळून, एका पाच महिन्यांच्या गरोदर विवाहितेने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची हृदयद्रावक घटना हर्सूल येथे घडली. आएशा बेगम अरबाज शेख (वय २३, रा. अजिंठा, ता. सिल्लोड) असे या दुर्दैवी विवाहितेचे नाव असून, तिच्या मृत्यूने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. व्यवसायासाठी माहेरून सात लाख रुपये घेऊन ये, या मागणीसाठी पती आणि सासरच्यांनी लावलेल्या तगाद्यामुळे एका हसत्याखेळत्या संसाराची राखरांगोळी झाली आहे.



आएशाचा विवाह २०२२ मध्ये भिवंडी येथील अरबाज शेख याच्याशी झाला होता. लग्नानंतर त्यांना दीड वर्षांचा चिमुरडा मुलगाही झाला. मात्र, सुखाचा काळ फार काळ टिकला नाही. पती अरबाज, सासू सायरा आणि जेठ अलीम यांनी फ्रुट व्यवसायासाठी ७ लाख रुपयांची मागणी करत आएशाचा मानसिक आणि शारीरिक छळ सुरू केला. माहेरची परिस्थिती हलाखीची असल्याने आएशाच्या कुटुंबीयांनी वारंवार मध्यस्थी करून संसार सावरण्याचा प्रयत्न केला, परंतु सासरच्या लोकांची पैशांची हाव कमी झाली नाही. उलट, मागील महिन्यात तिला माहेरी पाठवून देण्यात आले, ज्यामुळे ती प्रचंड मानसिक तणावात होती.

पाच महिन्यांची गरोदर असलेल्या आएशाने अखेर २५ डिसेंबरच्या रात्री या सततच्या त्रासाला कंटाळून मृत्यूला कवटाळले. आत्महत्येपूर्वी तिने लिहिलेल्या सुसाईड नोटमध्ये सासरच्या मंडळींच्या जाचाचा थरार लिहून ठेवला आहे . याप्रकरणी मयत विवाहितेच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून हर्सूल पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये (BNS 108, 80, 115(2), 352, 3(5)) पती, सासू आणि जेठ यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शुक्रवारी (२६ डिसेंबर) अजिंठा येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात आएशावर दफनविधी पार पडला. एका निष्पाप विवाहितेसह तिच्या पोटातील अर्भकाचाही बळी गेल्याने जनमानसात संताप व्यक्त होत आहे.

# सारकिन्ही येथे पीएम श्री योजनेअंतर्गत क्रीडांगणाचे होणारे काम अंदाजे सहा ते सात महिन्यापासून बंद

## मुख्याध्यापक शिक्षक वर्ग लक्ष देतील का?

**प्रतिनिधी भारत चव्हाण/ सारकिन्ही :** बार्शीटाकळी पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या सारकिन्ही येथील पि,एम, श्री,जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा सारकिन्ही येथे पीएम श्री अंतर्गत क्रीडांगण चे काम सुरू झाले होते परंतु अंदाजे सहा ते सात महिन्यापासून हे काम बंद पडले आहे मात्र क्रीडांगणचे अर्धवट काम सहा ते सात महिन्यापासून बंद आहे आणि झालेले थोडाफार क्रीडांगणचे काम हे बोगस असल्याचे पालक वर्गामध्ये चर्चा सुरू आहे काम सुरू करायला अंदाजे सहा ते सात महिना झाले असून हे काम काहीतरी ठेकेदारांनी थोडेफार मुरूम आणि मोठे गिट्टी टाकून अर्धवट कामे सोडलेले आहे या कामाकडे मुख्याध्यापक तसेच शिक्षक वर्गांचे दुर्लक्ष होत असल्याने क्रीडांगणाचे कामे दिवसेंदिवस लांबत चालले आहेत या शाळेला अंदाजे 100, वर्षाअगोदर गावातील राघोजी खंडारे, या व्यक्तीने शाळेला जागा दान दिली होती , गावाला लागूनच पी ,एम ,श्री,जिल्हा परिषद मराठी शाळेची खुली जागा आहे त्या जागेवरच गावातील मयत व्यक्तींचे अंत्यसंस्कार दफनविधी करण्यात येत होते, गावात योग्य समशानभूमी नसल्यामुळे जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेच्या जागेवर गावातील अंत्यविधी अंत्यसंस्कार दफन विधी करत होते परंतु या जागेवर पि , एम, श्री,जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थिनींना खेळण्यासाठी पि , एम, श्री, योजनेतून क्रीडांगण , ग्राउंड,तयार करण्याचे काम कासव गतिने सुरू आहे सुरुवातीला पहिला आलेला ठेकेदारांनी बारीक गिट्टी आणि विठाचे तुकडे टाकून थोडेफार काम केले होते आणि नंतर काहीतरी त्या ठेकेदारांमध्ये अडचण आल्यामुळे दुसरा ठेकेदारांनी काम करीत असल्याचे गावामध्ये चर्चा सुरू आहे त्यामुळे क्रीडांगण चे काम थोडेफार झाले तेही बोगस झाल्याचे पालक वर्गामध्ये ग्रामस्थांमध्ये चर्चा सुरू आहे आणि सहा ते सात महिन्यापासून काम बंद आहे या खुल्या जागेवर, अंदाजे 100, वर्षापासून गावात मयत झाली की पी ,एम ,श्री ,जिल्हा परिषद मराठी शाळेच्या जागेवर अंत्यसंस्कार दफनविधी असे कार्य करीत आहे आणि याच खुल्या जागेवर पी एम श्री योजनेतून क्रीडांगण , ग्राउंड,तयार करण्याचे काम सुरु आहे मात्र सहा ते सात महिन्यापासून क्रीडांगांचे



होणारे काम बंद पडले आहे त्यामुळे ग्रामस्थांमध्ये व पालक वर्गामध्ये उलट सुलट चर्चा सुरू आहे त्यामुळे गावातील पि एम, श्री,जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेतील विद्यार्थ्यांच्या मनात भीती निर्माण झाली आहे की त्या जागेवर आपण खेळलो तर आपल्या मागे भूत तर नाही लागेल आणि त्यामुळे विद्यार्थी भयभीत आतापासूनच होत आहे आणि, विद्यार्थी आपल्या पालकांना म्हणत आहे की बाबा आम्ही त्या समशानभूमी मध्ये खेळणार नाही , पी एम श्री जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेच्या दान दिलेल्या खुल्या जागेवर आतापर्यंत हजारो अंत्यसंस्कार ,दफनविधी ,करण्यात आले त्यामुळे गावातील तसेच जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेतील विद्यार्थी यांच्या मनात भीती निर्माण झाली आहे त्यामुळे घरी जाऊन आपल्या पालकांना म्हणतात की बाबा आम्ही पी एम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या जागेवर खेळणार नाही पी एम श्री योजनेतून नवीन क्रीडांगण ग्राउंड तयार करण्यात येत आहे आणि हे बंद पडलेले पूर्ण काम क्रीडांगणचे बोगस होत असल्याचे पालक वर्गामध्ये तसेच ग्रामस्थांमध्ये चर्चा सुरू आहे कारण सहा ते सात महिन्याच्या अगोदर क्रीडांगणाचे काम चालू केले होते क्रीडांगणच्या खुल्ले जागेवर बारीक गिट्टी विटाचे तुकडे आणि माती मिश्रित मुरूम टाकून ठेवलेले आहेत परंतु आतापर्यंत हे काम सुरू झाले नाही,, हे क्रीडांगणचे होणारे काम बोगस असल्याचे ग्रामस्थांमध्ये चर्चा चांगली सुरू आहे अंदाजे सहा ते सात महिन्यापासून क्रीडांगण चे काम बंद असल्यावरही मुख्याध्यापक शिक्षक वर्ग दुर्लक्ष करीत आहेत्यामुळे सहा ते सात महिन्यापासून हे काम बंद आहे फक्त काहीतरी थातूरमातूर जेसीबीने थोडाफार जागा करून त्या जागेवर ठेकेदारांनी बारीक गिट्टी विटाचे तुकडे माती मिश्रित मुरूम टाकून ठेवले आहे त्याच्यावर दबाई नाही काहीच नाही त्या जागेचे उपयोग ग्रामस्थ सकाळीच शौचालय साठी करतात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पीएम श्री अंतर्गत होणाऱ्या क्रीडांगण चे काम इस्टिमेट प्रमाणे चांगल्या प्रकारे करण्यात यावी व सहा ते सात महिन्यापासून क्रीडांगणचे काम बंद पडलेले हे काम त्वरित सुरू करण्यात यावी अशी मागणी पालक वर्ग व ग्रामस्थांकडून होत आहे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या कामाची चौकशी करून होणाऱ्या बोगस काम थांबवुन इस्टिमेट प्रमाणे करावे अशी मागणी ग्रामस्थांकडून व पालक वर्गाकडून तसेच विद्यार्थी कडून होत आहे

# समनक जनता पार्टी जिल्हा परिषद निवडणूका ताकतीने लढणार !

## बार्शीटाकळी येथे पार पडली जिल्हास्तरीय बैठक

**प्रतिनिधी भारत चव्हाण/ सारकिन्ही ,बार्शीटाकळी :** समनक जनता पार्टीची जिल्हास्तरीय बैठक दि. 27 डिसेंबर रोजी स्थानिक अरुणोदय कॉम्प्लेक्स येथे पार पडली. या बैठकीत आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूका ताकतीने लढण्याची घोषणा करण्यात आली. या बैठकीला प्रमुख मार्गदर्शक म्हणून राष्ट्रीय महासचिव प्रा. डॉ. अनिल राठोड हे होते. बैठकीच्या अध्यक्षस्थानी उदयसिंग नायक हे होते. यावेळी मंचावर जिल्हाध्यक्ष कृष्णा चव्हाण, वाशिम जिल्हाध्यक्ष गजानन धामणे, बार्शीटाकळी तालुकाध्यक्ष अतिश राठोड, पातुर तालुकाध्यक्ष सतीश राठोड,......... आदी उपस्थित होते. या बैठकीत विविध सर्कल मधील पदाधिकाऱ्यांनी निवडणुकीबाबतचा आढावा सादर केला. यावेळी सर्कलनिहाय उमेदवारी बाबत कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी, प्रा. डॉ. अनिल राठोड यांनी पक्षाची ध्येय धोरणे विशद करून खऱ्या अर्थाने लोकशाही वाचविण्यासाठी जय मानवता, जय संविधान, जय भारत, जय विज्ञान, जय जवान, जय किसान हे ब्रीदवाक्य घेऊन प्रस्थापित राजकारणाला बगल देत लोकप्रतिनिधित्वापासून वंचित असलेल्या सर्व जातींमधील कार्यकर्त्यांना उमेदवारी देणार असल्याचे जाहीर केले. तसेच निवडणूकिच्या तयारीबाबत पदाधिकाऱ्यांना सूचना केल्या.




यावेळी जिल्हाध्यक्ष कृष्णा चव्हाण म्हणाले की, आजही बहुजन समाजातील अनेक जातींना प्रचलित पक्षांकडून उमेदवारी दिल्या जात नाही.

काही ठराविक लोकांचीच राजकारणावर मक्तेदारी आहे.

ही मक्तेदारी मोडीत काढून छोट्या छोट्या जात समूहाला जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची उमेदवारी आम्ही देणार आहोत. यावेळी गजानन धामणे यांनी जिल्हा परिषद निवडणुकीला सामोरे जाताना पक्षाचा अजेंडा, आणि निवडणुकीच्या मुद्द्यांवर मार्गदर्शन केले. तसेच पक्षात काम करू इच्छिणाऱ्या कार्यकर्त्यांनी स्वाभिमानाने पक्षात सहभागी व्हावे असे आवाहन केले.

या बैठकीला जिल्हाभरातील सर्व सर्कल मधील विविध गावातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित बहुतांश कार्यकर्त्यांनी आपले निवडणुकीबाबत मनोगत व्यक्त केले. यावेळी पक्षाच्या बार्शीटाकळी शहराध्यक्षपदी संदीप राठोड यांचे नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली. या बैठकीला जिल्ह्यातील शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन बार्शीटाकळी तालुकाध्यक्ष अतिष राठोड यांनी केले

मनोगत - कुलदीप चव्हाण सेवक राठोड मनोहर राठोड गणेश राठोड रितेश राठोड अजबराव जाधव गोटू राठोड बैठकीच्या प्रारंभी संविधानाची प्रस्ताविका सादर करण्यात आली . बैठकीचा शेवट राष्ट्रगीताने झाला

# स्वातंत्र्य सेनानी जवाहरलाल दर्डा विधी महाविद्यालयात 'वीर बाल दिवस' साजरा

## परीक्षेच्या तयारीसाठी 'माइंडव्यूह' (Mindvyuh) ॲप विद्यार्थ्यांसाठी देत आहे महत्त्वाची साथ

**लखन लोंढे/यवतमाळ :** २६ डिसेंबर स्थानिक स्वातंत्र्य सेनानी जवाहरलाल दर्डा विधी महाविद्यालयात आज शिखांचे दहावे गुरु गोविंद सिंग यांच्या पुत्रांच्या बलिदानाच्या स्मरणार्थ 'वीर बाल दिवस' अत्यंत भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलताना महाविद्यालयाचे विद्यार्थी ॲड. भावेश श्रीराव यांनी "कमी वयात धर्मासाठी आणि सत्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या साहिबजाद्यांचे जीवन आजच्या तरुणांसाठी प्रेरणास्त्रोत आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्याकडून धैर्याचा आणि राष्ट्रप्रेमाचा आदर्श घ्यावा," असे प्रतिपादन यांनी केले. या निमित्ताने आयोजित विशेष कार्यक्रमात महाविद्यालयाचे विद्यार्थी ॲड. भावेश श्रीराव यांनी विद्यार्थ्यांना आगामी परीक्षेच्या तयारीसाठी व 'माइंडव्यूह' (Mindvyuh) ॲपच्या वापराबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे डॉ. संदीप नगराळे होते, तर कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ. स्वप्नील सगणे होते.नुकतेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे



घेण्यात आलेल्या 'अविष्कार २०२५' या संशोधन स्पर्धेत भावेश श्रीराव यांनी जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक पटकावून महाविद्यालयाचे नाव उंचावले आहे. त्यांनी विकसित केलेले 'माइंडव्यूह' ॲप सध्या विद्यार्थ्यांच्या पसंतीस उतरले आहे.

आपल्या भाषणात भावेश यांनी सांगितले की, "माइंडव्यूह ॲप" हे विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी आणि त्यांना अभ्यासात मदत करण्यासाठी विकसित करण्यात आले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांना विषयांचे सखोल ज्ञान मिळावे यासाठी 'अभ्यास साहित्य' (Study material) आणि 'ध्वनिमुद्रित व्याख्याने' (Audio Lectures) यांसारखी विविध वैशिष्ट्ये उपलब्ध करून देण्यात आली आहेत. आगामी परीक्षांच्या दृष्टीने हे ॲप अत्यंत उपयुक्त ठरत असून, विद्यार्थी याचा मोठ्या प्रमाणावर लाभ घेत आहेत."

विशेष म्हणजे, या ॲपमधील अभ्यासक्रम आणि शैक्षणिक साहित्य विकसित करण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापकांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. यामध्ये प्रामुख्याने प्राचार्य डॉ. विजेश बी. मुनोत, डॉ. संदीप नगराळे, प्रा.स्वप्नील सगणे आणि प्रा. वैशाली फाले यांनी विषय तज्ज्ञ म्हणून मदत केली असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संदीप नगराळे यांनी यावेळी भावेश श्रीराव यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले आणि विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा वापर करून अभ्यासात प्रगती करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे आयोजन व प्रास्तविक समन्वयक डॉ. स्वप्नील सगणे यांनी केले.सदर उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजेश बी. मुनोत यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा लाभ घेत 'माइंडव्यूह' ॲपबद्दल उत्सुकता दर्शविली.

# महापालिका निवडणूक प्रशिक्षणात पालघर जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांचे अतोनात हाल; सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यातील १०८६५ कर्मचारी

**पालघर :** मिरा- भाईंदर, वसई – विरार व भिवंडी- निजामपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी पालघर जिल्ह्यातील १०८६५ कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून त्यामध्ये अधिक तर शासकीय व अनुदान शाळेतील शिक्षकांचा समावेश आहे. निवडणुक कर्मचाऱ्यांच्या आज आयोजित प्रशिक्षणात गोंधळाचे वातावरण झाल्याचे चित्र दिसून आले असून कर्मचाऱ्यांना आपल्या भागातून शहरात पोहोचताना व परतताना अतोनात हाल झाले. विशेष म्हणजे अनेक शाळांमध्ये मुख्याध्यापक, पर्यवेक्षक यांच्यासह मोजके शिक्षक कामावर असल्याने शाळांना आज अघोषित सुट्टी साजरी झाली.

निवडणूक कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण आज वसई व भाईंदर येथे आयोजित करण्यात आले होते. पालघर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील शिक्षकांना या दोन्ही ठिकाणी पोहोचण्यासाठी प्रथम पश्चिम रेल्वेचे जवळचे रेल्वे स्टेशन गाठणे व त्यानंतर वसई अथवा भाईंदर पर्यंत प्रवास करण्याचा एकाच वेळी प्रसंग आला. विरार ते डहाणू रोड दरम्यान उपनगरीय गाड्यांची संख्या मर्यादित असल्याने प्रशिक्षणाला जाण्याच्या तसेच परतण्याच्या वेळेत उपनगरीय गाड्यांमध्ये तुफान गर्दी झाली. इतर वेळी रेल्वे प्रवासाची सवय नसणाऱ्या शिक्षक व शासकीय कर्मचाऱ्यांना उपनगरीय सेवेतील चेंगराचेंगरीचा त्रास झाला.

प्रशिक्षणाच्या ठिकाणी शिक्षकांना नोंदणी करण्यासाठी पुरेशी व्यवस्था नसल्याचे तसेच नोंदणी कर्मचाऱ्यांकडून उद्धट वर्तन झाल्याच्या तक्रारी पुढे आल्या असून अनेक निवडणूक कर्मचाऱ्यांनी नोंदणी केल्यानंतर प्रशिक्षणात प्रत्यक्षात सहभागी न होता घरचा रस्ता पकडल्याचे खात्रीलायक सूत्रांकडून समजते. त्यामुळे प्रामाणिकपणे प्रशिक्षण घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवडणूक अधिकाऱ्यांच्या बोलण्याला सामोरे जावे लागले.महानगरपालिका क्षेत्रातील या निवडणूक कार्यक्रमात शासकीय व अनुदानित शाळेतील बहुतांश शिक्षकांना निवडणूक कर्मचारी म्हणून सहभागी करून घेण्यात आले. त्यामुळे प्रशिक्षणाच्या वेळी शाळांमधील शिक्षकांची संख्या मोजकी राहिल्याने विद्यार्थ्यांना आज भरलेल्या



शाळेमध्ये सुट्टीचा अनुभव आला. विशेष म्हणजे अपंग शिक्षकांना निवडणूक ड्युटी मधून सूट देण्याची पद्धती शासनाकडून अवलंबली जाते. आता याप्रसंगी अपंग कर्मचाऱ्यांना देखील निवडणुकीचे काम सोपवल्याची माहिती काही शिक्षकाने लोकसत्ताला दिली.मीरा भाईंदर येथील निवडणूक कर्मचाऱ्यांना वसई येथील प्रशिक्षण केंद्रात बोलवले गेल्याने अशा अनेक शिक्षकांना मनस्तापाला सामोरे जावे लागले. तर शिक्षकांकडून उपस्थित केल्या जाणाऱ्या प्रश्नाला समर्पित उत्तर मिळाले नसल्याचे तसेच कारवाई करण्याबाबत दमदाटी करण्याचा प्रयत्न झाल्याचे आरोप पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शिक्षकांनी व शासकीय कर्मचाऱ्यांनी केले आहेत. या प्रकरणात महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तसेच जिल्हाधिकारी यांनी आगामी काळात आवश्यक दक्षता घ्यावी व निवडणूक कर्मचाऱ्यांच्या सोयी सुविधांचा विचार करावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

**तालुका निहाय कर्मचाऱ्यांची नेमणूक**

महापालिका पार्श्वभूमीवर निवडणूक व्यवस्थापनाला वेग आला असून, विविध तालुक्यातील कर्मचारी वृंदाची सविस्तर माहिती मिरा–भाईंदर, वसई–विरार व भिवंडी महानगरपालिका प्रशासनाकडे सादर करण्यात आली आहे. तालुकानिहाय कर्मचाऱ्यांचे वाटप करण्यात आले आहे.

दरम्यान, वसई–विरार शहर महानगरपालिकेकडून वरीलप्रमाणे वाटप करण्यात आलेल्या तालुक्यांखेरीज इतर तालुक्यांतील कर्मचाऱ्यांबाबत यापूर्वी कोणतेही आदेश काढले असतील, तर ते तत्काळ रद्द करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे दुबार आदेश, किंवा प्रशासकीय अडचणी टाळता येणार असून निवडणूक प्रक्रिया अधिक सुलभ होणार आहे.

एकूणच १०,८६५ कर्मचाऱ्यांच्या उपलब्धतेमुळे मिरा–भाईंदर, वसई–विरार व भिवंडी–निजामपूर महानगरपालिका क्षेत्रातील आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रशासन पूर्णतः सज्ज झाले असल्याचे चित्र आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत, आणि काटेकोरपणे पार पाडण्यासाठी मदत मिळणार आहे. असे निवासी उपजिल्हाधिकारी सुभाष भागडे यांनी प्रसिध्दी पत्रकात स्पष्ट केले आहे.

**मिरा–भाईंदर महानगरपालिकासाठी निवडणूक कामकाजासाठी**

**डहाणू :** १,८७२ कर्मचारी

**विक्रमगड :** १,११५ कर्मचारी

असे एकूण २,८९७ कर्मचारी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**वसई–विरार शहर महानगरपालिकासाठी सर्वाधिक कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आले असून,**

पालघर : २,७१२

वसई : १,२७३

तलासरी : १,०२३

जव्हार : १,१३१

मोखाडा : ६७२

असे एकूण ६,८११ कर्मचारी तपशील महापालिका प्रशासनाला देण्यात आला आहे.भिवंडी–निजामपूर शहर महानगरपालिकासाठी वाडा तालुक्यासाठी १,१५७ कर्मचारी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.